# ॥ चैतन्य लहरी ॥

सन १९९७ क्र. १ व २



सर्व ब्रम्हचैतन्य हे शांत तत्व आहे हे सर्व काही करते. तुम्हाला सर्व काही स्वीकारण्यासाठी, तसेच तुमच्या प्रगतीत कैलासाची उंची गाठण्यासाठी शांत राहीले पाहीजे.

- श्री माताजी निर्मला देवी
दिवाळी पुजा

# कुंडलिनी आणि श्री गणेशपूजा

(हे भाषण श्री माताजींनी अमर हिंद मंडळ, दादर येथे दिनांक २२ सप्टेंबर १९७९ रोजी प्रचंड जनसमुदायासमोर दिले.)

(श्री गणेशाची साधना ही अनादी असून, प्रत्येक योगाकरिता सुरुवातीची मुख्य साधना ठरली. त्याचे कारण, श्री आदिशक्तींनी ब्रह्मांडाच्या निर्मितीपूर्वी, सर्वप्रथम श्री गणेशांना बनविले. या विशेष तत्त्वाचा आत्मा, ज्या महाराष्ट्रभूमीमध्ये श्री गणेशांची पूजा विशेष रुपाने होते, तिथले साधक कधीतरी जाणतील कां ? ह्याचे उत्तर होकारार्थी असल्यास, आपणास परमपूज्य श्री माताजी निर्मलादेवीजींचे खालील भाषण वाचून सहजयोग आत्मसात केल्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही.)

**आ**जच्या ह्या नवरात्री, प्रथमदिन शुभ प्रसंगी अशा ह्या सुंदर वातावरणामध्ये इतका सुंदर विषय म्हणजे बरेच योगायोग जुळलेले दिसतात. आजपर्यंत कधी पूजनाचा विषय कुणीच मला सांगितला नव्हत, पण तो किती महत्त्वपूर्ण आहे ! विशेषतः या योगभूमीत, या आपल्या भारतभूमीत, त्यातल्यात्यात महाराष्ट्रातल्या या पुण्यभूमीत, जेथे अष्टविनायकांची रचना सृष्टीदेवीने केलेली आहे तेथे श्री गणेशाचे महात्म्य काय आहे, किंवा या श्री अष्टविनायकांचे महत्त्व काय आहे वगैरे गोष्टी फारशा लोकांना माहीत नाहीत. याचे मला फार आश्चर्य वाटते. कदाचित् ज्यांना सर्वकाही समजत होते, किंवा ज्यांना सगळं काही माहिती आहे असे जे मोठमोठे साधुसंत ह्या आपल्या संतभूमीत झालेले आहेत, त्यांना कोणी बोलायची मुभा दिली नसणार किंवा त्यांचे कोणी एकून घेतले नसेल. पण याबद्दल सांगावे तितके थोडे आहे आणि एकाच्या ऐवजी सात भाषणे जरी ठेवली असली, तरी सुद्धा श्री गणेशाबद्दल बोलताना मला ती पुरणार नाहीत.

आजचा सुमुहूर्त म्हणजे घटपूजनेचा. घटस्थापना ही अनादि आहे म्हणजे जेव्हा या सृष्टीची रचना झाली; (सृष्टीची रचना एकाच वेळी झालेली नाही. तर ती अनेकदा झालेली आहे.) तेव्हा आधी घटस्थापना करावी लागली. आता घट म्हणजे काय ? हे अत्यंत सूक्ष्मात समजले पाहिजे. पहिल्यांदा ब्रह्मतत्त्व म्हणून जी एक स्थिती असते, तेथे परमेश्वराचे वास्तव्य असते. त्याला आपण इंग्लिशमध्ये एन्ट्रॉपी (Entrophy) म्हणू. ह्या स्थितीत काहीहि हालचाल नसते. परंतु ह्या स्थितीमध्ये जेव्हा इच्छेचा उद्भव होतो किंवा इच्छेची लहर 'परमेश्वराला ' येते तेव्हा त्याच्यामध्ये ही परमेश्वरी इच्छा समावते. ती इच्छा अशी की, आता काहीतरी संसारामध्ये सृजन केले पाहिजे. ही त्यांना इच्छा का होते ! ही त्यांची इच्छा. परमेश्वराला इच्छा का होते हे समजणे माणसाच्या बुद्धिच्या आवाक्याबाहेरच्या गोष्टी आहेत. अशा पुष्कळशा गोष्टी मानवाच्या सर्वसाधारण बुद्धीच्या आकलनाबाहेरच्या आहेत. पण जशा आपण त्या सर्व मानून घेतो, तसेच हेही मानले पाहिजे की, परमेश्वराची इच्छा हा त्यांचा आपला स्वतःचा शोक आहे. त्यांची इच्छा. त्यांना जे काही करायचे आहे ते करत असतात. ही इच्छा त्यांच्यामध्ये विलीन होते. आणि ती परत जागृत होते. जसा एखादा मनुष्य झोपावा आणि परत जागृत व्हावा. झोपल्यावर त्यांच्या इच्छा जरी त्यांच्याबरोबर झोपल्या असल्या, तरी त्या तिथेच असतात. आणि जागृत झाल्या की कार्यान्वित होतात. तसेच परमेश्वराचे आहे. जेव्हा त्यांना इच्छा झाली; की, आम्ही आता एका सृष्टीची रचना करायची. तेव्हा या सर्व सृष्टीच्या रचनेची जी इच्छा, जी आपण म्हणू, तरंग आहेत किंवा त्याच्या ज्या लहरी आहेत त्या एकत्र होतात आणि त्या एकत्र झाल्यावर त्या घटात भरल्या जातात. तो हा घट. म्हणजे परमेश्वर व परमेश्वरानी इच्छाशक्ती जर वेगळी केली व आपण तसे समजू शकलो तर, ते कळेल. आपलेहि तसेच असते, पण थोडा फरक असतो. आपण आणि आपली इच्छाशक्ती यात फरक आहे. ती प्रथम जन्माला येते. जोपर्यंत तुम्हाला कोणत्या गोष्टीची इच्छा होत नाही तोपर्यंत ती गोष्ट व त्याचे रुपांतर होत नाही. म्हणजे आता हे जे एक आपले मोठे सुंदर जग बनवलेले आहे हे सुद्धा कोणाच्या तरी इच्छेचेच फळ आहे. प्रत्येक गोष्ट इच्छा झाल्यावरच कार्यान्वित होते. आणि परमेश्वराची इच्छा ही कार्यान्वित होण्यासाठी त्याच्यापासून वेगळी करावी लागते ती परमेश्वरामध्ये सामावून राहिली तर ती सुप्तावस्थेत असते. तेव्हा ती त्यापासून वेगळी होऊन आपल्या कार्याला लागते. तिला आपण ' आदिशक्ती ' असे म्हणतो. ही प्रथम स्थिती जेव्हा आली तेव्हा घटस्थापना झाली. ही अनादिकालापासून अनेक वेळा झाली आहे. आणि आजही आपण जेव्हा घटस्थापना करतो, तेव्हा त्या अनादि अनंत

क्रियेला आठवतो. म्हणजे ह्या वेळेला (नवरात्र प्रथमदिनी) आपण ती घटस्थापना करतो. म्हणजे किती मोठी गोष्ट आहे ही ! लक्षात ठेवा. त्या वेळेला परमेश्वराने जी इच्छा केली, ती कार्यान्वित करण्याच्या अगोदर ती एकत्रित केली. ती एका घटात घातली, तीच इच्छा आज आपण पूजीत आहोत. त्याचे आज आपण पूजन केले. ती इच्छा परमेश्वराला झाली. त्यांनी आज आपल्याला मनुष्यत्वाला आणले. एवढया मोठया स्थितीला पोहचवले. तेव्हा आपले परम कर्तव्य आहे की, त्याच्या ह्या इच्छेला आधी वंदन केले पाहिजे.

त्या इच्छेला, आमच्या सहजयोगाच्या भाषेत श्री महाकालीची इच्छा म्हणतो किंवा महाकालीची शक्ती म्हणतो. ही महाकालीची शक्ती आहे आणि हे जे नवरात्राचे नऊ दिवसाचे (महाराष्ट्रात विशेषेकरून) समारंभ होतात, ते ह्या महाकालीची जी काही अनेक अवतरण झाली त्यांच्याबद्दल आहेत. आता महाकाली शक्तीच्या म्हणजे इच्छाशक्तीच्या पूर्वी काहीही घडू शकत नाही. म्हणून इच्छाशक्ती आदि आहे आणि संतही तिच्यातच होतो. पहिल्यांदा इच्छेतून सगळे निघते आणि इच्छेतच विलीन होऊन जाते. तर ही श्री सदाशिवाची शक्ती किंवा आदिशक्ती आहे व महाकाली शक्ती म्हणून आपल्यामध्ये ती वावरत असते. जर आपले शरीर विराटाचे अंशस्वरुप मानले तर त्याच्यामध्ये डावीकडे जी शक्ती आहे ती आपल्या इडानाडीतून प्रवाहित असते व त्या शक्तीला महाकालीची शक्ती म्हणतात. हिचा माणसामध्ये सगळयात जास्त प्रादुर्भाव झालेला आहे. प्राणीमात्रामध्ये तितका नाही. आपल्यामध्ये ती आपल्या उजव्या बाजूने डोक्यातून येते. नंतर डावीकडे जाऊन त्रिकोणाकार अस्थींच्या खाली श्री गणेशाचे जे स्थान आहे तिथे जाऊन संपते. म्हणजे महाकालीच्याशक्तीने फक्त सगळयात पहिल्यांदा श्री गणेशाला जन्म दिला. तेव्हा श्री गणेशाची स्थापना झाली. गणेश हे सर्वात पहिल्यांदा स्थापन केलेले दैवत आहे. आणि त्याचप्रमाणे जसे महाकालीचे आहे, तसेच श्री गणेशाचे आहे. हे बीज आहे. आणि बीजातूनच सर्व विश्व निघाल्यावर परत बीजातच सामाविले जाते. श्री गणेश हा सर्व जे काही आहे, त्याचे बीज आहे. जे आपल्याला समोर दिसते, कृतीत दिसते, इच्छेत दिसते त्याचे हे बीज आहे. म्हणून श्री गणेश हा सगळयात मुख्य देव मानला जातो. इतकेच नाही तर श्री गणेशाचे पूजन केल्याशिवाय, आपण कोणतेही कार्य करू शकत नाही. मग ते शैव असोत, वैष्णव असोत, अगर ते ब्रह्मदेवाला मानणारे असोत किंवा आणखी कोणी असोत. सगळे आधी श्री गणेशाचे पूजन करतात. त्याला कारण असे आहे की, श्री गणेश तत्त्व परमेश्वराने सर्वात पहिल्यांदा या सृष्टीत बसविले. श्री गणेशतत्त्व म्हणजे ज्याला आपण ' अबोधिता ' म्हणतो, किंवा इंग्लिशमध्ये इनोसन्स् (Innocence) म्हणतो. आता हे तत्व अगदी सूक्ष्म आहे. ते आपल्याला समजत नाही. जे लहान मुलांमध्ये वास्तव्य करते, ज्याचा सगळीकडे आपण आविर्भाव पाहतो व त्याचा सुगंध पसरलेला असतो. त्यामुळेच लहान मुले इतकी प्रिय वाटतात, असे हे अबोधिताचे तत्त्व आहे. ते ह्या श्री गणेशामध्ये सामावलेले आहे. आता मानवाला हे समजणे जरा कठीण जाते की असे कसे एका देवतामध्ये हे सगळे सामाविलेले आहे ? पण जर आपण सूर्याला बघितले, तर सूर्यामध्ये जशी प्रकाश देण्याची शक्ती आहे, तशीच ती श्री गणेशामध्ये ही ' अबोधिता ' तर ही जी अबोधितेची शक्ती परमेश्वराने आपल्यामध्ये भरलेली आहे, ह्या अबोधितेच्या शक्तीला आपण पूजतो. म्हणजे आम्ही सुद्धा असे अबोध झाले पाहिजे. अबोधितेचा अर्थ पुष्कळांना असा वाटतो की, आपण अज्ञानी झाले पाहिजे. अबोध शब्दामध्ये अर्थ असा आहे की, जो एक भोळेपणा एखाद्या लहान मुलात असतो किंवा निरागसता असते, तो भोळेपणा किंवा निरागसता आपल्यामध्ये आली पाहिजे. हे किती मोठेतत्त्व आहे ते आपल्या लक्षात येत नाही. एक लहान मुलगा समजा खेळायला लागला. आजकालची मुले म्हणजे त्यांचा भोळेपणा विशेष राहिलेला नाही. त्याला कारण आपणच आहोत. आपण दुसऱ्यांना तरी सांगून काय सांगायचे. आम्हीच आमचे धर्म कसे पाळतो आहोत ? आम्हीच आमच्या धर्मात कितपत आहोत ? तेव्हा आम्हीच आमच्या मुलांना किती धार्मिक करतो आहोत ? त्याच्यावर हे सर्व अवलंबून आहे आणि ते त्याचेच फळ असे समजले पाहिजे. आता हे जे माणसामध्ये अबोधितेचे लक्षण आहे, ते एखाद्या लहान मुलाला बघून तुम्ही ओळखू शकता. ज्या माणसात ' अबोधिता ' असते, तो कितीही मोठा झाला तरी ती त्याच्यात असते. जसे एखादा लहान मुलगा जर खेळत असला तर खेळेल, तो अगदी शिवाजी बनेल, किल्ला बनवेल, सगळं काही करेल, मग ते सगळे सोडून तो निघून जाईल. म्हणजे सगळे करून सोडून द्यायचे. सगळे केले ते सोडून त्याच्याबद्दल तटस्थता ठेवायची. त्याच्यामध्ये काही आपले मन गुंतवायचे नाही.

हे एक मुलांचे साधारण वागणे असते. तुम्ही कोणत्याही मुलाला काहीतरी दिले, तर ते तो जपून ठेवील, फार वेळ ते जपून ठेवील. आणखी नंतर मग थोडया वेळानी त्याला त्याचे काहीच वाटायचे नाही. जर तुम्ही त्याला भूलवून ते काढून घेतले, तर त्याला त्याचे काहीच वाटायचे नाही. पण त्यातल्या त्यात काहीकाही गोष्टी लहान मुलगा मुळीच सोडत नाही. की, जे त्याला फारच महत्त्वाचे असते. पैकी एक त्याची आई. त्याची आई तो सोडत नाही. बाकी सगळे काही तुम्ही काढून घेतले तरी चालेल त्याला ऐश्वर्य समजत नाही, त्याला पैसे समजत नाहीत. त्याला शिक्षण समजत नाही, काही समजत नाही. फक्त समजते त्याला त्याची आई ही माझी आई आहे. ही माझी जन्मदात्री आहे. हीच माझे सगळे काही आहे. तो

आईपेक्षा कोणत्याही गोष्टीला महत्त्व देत नाही. म्हणजे आपल्या सर्वांमध्ये लहानपणापासून हे बीजतत्त्व आहे. म्हणून आपण आपल्या आईला सोडत नाही. आपल्याला माहिती असते तिने आपल्याला जन्म दिला आहे. पण त्याशिवाय एक दुसरी आई. परमेश्वरानी आपल्यामध्ये आपल्याला दिली आहे. आणि तीच आई म्हणजे स्वतःमधील ही ' कुंडलिनी ' आहे कुंडलिनी माता, जी आपल्या त्रिकोणाकार अस्थीमध्ये वेटोळे घालून परमेश्वराने बसवली आहे, ती आपली आई आहे. आणि आपण तिला सारखे शोधत असतो. आपल्या सर्व शोधामध्ये मग ते राजकीय असोत सामाजिक असोत वा शैक्षणिक असोत. कोणत्याही गोष्टीचे तुम्हाला वेड असो, त्या सर्व वेडाच्या मागे तुम्ही ह्या कुडलीनी आईला शोधत असता. ही कुंडलीनी आई, तुम्हाला परमपदाला पोचविते की जिथे सर्वतऱ्हेचे समाधान तुम्हाला मिळते. ह्या आईचा शोध म्हणजेच ह्या आईप्रती ओढ, जी आपल्यामध्ये अदृश्यामध्ये असते, ती आपल्यात श्री गणेश तत्त्वामुळे जागृत राहते.

ज्या माणसाचे श्री गणेशतत्त्व अगदी नष्ट पावलेले आहे त्याच्यामध्ये अबोधितामध्ये, अनेक गुण माणसामध्ये उत्स्फूर्त होतात. म्हणजे आई, बहीण, भाऊ किती झाले तरी त्याची पवित्रता ठेवणे. व्यवहारात वागताना समाजात वावरताना, संसारात रहाताना, परमेश्वरानी एक आपली पत्नी आणि बाकी सर्व जगाचे लोक जे कोणी आहेत. त्यांचे आपले पवित्र नाते आहे असे परमेश्वरानी सांगितले आहे आणि जर असे तुमच्या व्यवहारात दिसायला लागले तर मात्र मानले पाहिजे की, ह्या मनुष्यामध्ये खरी अबोधिता आहे. ते त्याचे खरे लक्षण आहे. अबोधितेचे लक्षण हे आहे की, माणसाला सगळयांच्यामध्ये पावित्र्य दिसते. कारण स्वतःमध्ये पावित्र्य आल्यामुळे, तो अपवित्र नजरेनी कोणाकडे बघत नाही. आता आपल्याकडे पवित्रता समजाऊन सांगायला नको. आपल्याकडे माणसाला पवित्रता काय आहे हे माहीत आहे. इंग्लंडमध्ये, अमेरिकेत समजवायला पाहिजे. कारण त्यांची डोकी फिरलेली आहेत. पण तुम्ही अजून सूज्ञ आहात. विशेषतः ह्या भारतात तरी देवकृपेने, अष्टविनायककृपेने म्हणा किंवा आपल्या पूर्वपुण्याईने म्हणा आपल्या गुरुसंतानी केलेल्या सेवेमुळे म्हणा पृथ्वीवर महाराष्ट्र ही एक अशी भूमी आहे की, इथून ही पवित्रता मात्र अजून हललेली नाही. आणि ह्या पवित्रतेचे तुम्ही आज पूजन काढलेले आहे. म्हणजे पूजन करताना तुमच्यामध्ये ती पवित्रता आहे किंवा नाही इकडे लक्ष दिले पाहिजे. आता आमच्या सहजयोगात गणेशतत्व ज्यांच्यात नाही, त्यांच्यामध्ये हे पावित्र्य नाही. तो मुळी कामाचा नाही. कारण हा जो गणपती बसवलेला आहे, तिथे तो म्हणजे श्री गौरीचा पुत्र आहे आणि श्री गौरी म्हणजेच आपल्यामध्ये स्थित जी कुंडलिनी शक्ती आहे, ती ही गौरीशक्ती आहे. आज श्री गौरीपूजन आहे आणि आज श्री गणेशपूजन आहे. म्हणजे केवढा मोठा दिवस आहे, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. आपल्यामध्ये जे श्री गणेश तत्व आहे ते श्री गौरीला सांगते की, हा मनुष्य ठीक आहे किंवा नाही. म्हणजे त्याच्यामध्ये व्यवस्था किती सुंदर केलेली आहे ती बघा.

इडा आणि पिंगला ह्या दोन नाड्या आपल्यामध्ये आहेत. पैकी एक महाकाली आणि एक महासरस्वती. ह्या दोन नाड्या आहेत. ह्या महाकालीतूनच महासरस्वती निघालेली आहे. म्हणजे ती क्रियाशक्ती आहे. पहिली इच्छाशक्ती आहे आणि दुसरी क्रियाशक्ती आहे. या दोन्ही शक्तीतून जे काही आपण ह्या जन्मात केलेले आहे, पूर्व जन्मात केलेले आहे, जे काय आपले सुकृत आहे आणि जे आपले दुष्कृत आहे, या सगळयांचा पाढा तिकडे बसून लहानसे एक हे जे श्री गणेश देव आहेत, ते घेत असतात. ते बघत असताना ह्या माणसांनी किती पुण्य केलेले आहे. आता पुण्य कशाशी खातात हे आज कालच्या मॉडर्न लोकांना काही माहीत नाही आणि त्याबद्दल त्यांचा विचारही नाही लोकांना असे वाटते की, ह्याला काय अर्थ आहे? पुण्य किती आहे? काय आहे? जर ती पापुण्याची भावनाच नाही. तर पाप आणि त्याचे क्षालन वगैरे ह्या गोष्टी कळण्यात काही अर्थच राहत नाही. मानवाला पाप आणि पुण्य हा असा भाव आलेला असतो. जनावराला तो नसतो. जनावराला अनेक भाव नसतात. आता समजा एखाद्या जनावराला तुम्ही शेणातून घेऊन गेलात किंवा घाणीतून घेऊन गेलात तर त्याला वास येत नाही. त्याला सौंदर्य कशाशी खातात ते माहीत नाही. तुम्ही मानव झाल्याबरोबर तुम्हाला पाप-पुण्याचा विचार येतो. तुम्हाला समजते की, हे चुकलेले आहे. हे पाप आहे, हे करू नये, हे पुण्य आहे हे केले पाहिजे आणि पाप-पुण्याचा निवाडा आपण करण्यापेक्षा, पापुण्याचा संबंध रोखठोक हिशेब श्री गणेश आपल्यात बसून करत असतात. प्रत्येक मानवामध्ये श्री गणेशाचे स्थान आहे आणि ते प्रोटेस्ट ग्लॅन्ड (Prostate Gland) च्या जवळ असून त्याला आम्ही मूलाधार चक्र असे म्हणतो. त्रिकोणाकार अस्थीला मूलाधार म्हटले आहे. तिथे कुंडलिनी आई बसलेली आहे. त्या त्रिकोणाकार अस्थीच्या खाली श्री गणेश आरामात जाऊन तिथे तिची रक्षा म्हणण्यापेक्षा, तिच्या लज्जेचे रक्षण करीत असतात. आता आपल्याला असे माहीतच आहे की,श्री गणेशाची स्थापना श्री गौरींनी कशी केली. तिचे लग्न झाले होते. पण अजून पतीशी भेट झालेली नव्हती. त्यावेळी ती आंघोळीला गेली आणि आपल्या अंगातला मळ काढून तिने श्री गणेश बनविला. आता बघा ह्यातामध्ये संबंध जर व्हायब्रेशन्स (Vibrations) म्हणजे चैतन्य लहरी आहेत, तर त्या सगळ्या शरीराला सुद्धा चैतन्य लहरी आल्या असत्या आणि हे चैतन्य जर वाहत असेल आणि ते जर श्री गौरीमातेने मळात घेतले, तर त्या मळालाही ते चैतन्य येते त्या मळाचा तिने गणपती केला. आणि तो आपल्या न्हाणीच्या बाहेरच्या बाजूला ठेवला. समोरच्या बाजूला नाही ठेवला कारण न्हाणीतून सगळी घाण वाहत असते. आपल्याकडे पुष्कळांना माहीत असेल की, न्हाणीतले पाणी जेव्हा वाते तेव्हा त्याच्यावर पुष्कळदा अळूची पाने किंवा कमळाची फुलेसुद्धा लोक लावतात अणि तिथे ती चांगली लागतात. आश्चर्याची गोष्ट आहे, की जिथे फार घाण पाणी असेल तिथेच

कमळाची फुले लागतात.त्याचेच उदाहरण श्री गणेशाचे आहे. म्हणजे सर्वात घाणीचा जो प्रदेश आहे, त्या घाणीवरती हे कमळ लागलेले आहे आणि तो आपल्या सुगंधाने त्या सर्व घाणीला सुगंधीत करत असतो. ही जी त्याची शक्ती आहे, ती शक्ती आपल्या आयुष्यात सुद्धा फार मदत करते. आपल्यामध्ये आजकाल जी काय घाण दिसते ती ह्या श्री गणेशतत्वामुळे सुरक्षितपणे दूर होते. आता ह्या श्री गणेशतत्वाने कुंडलिनीचे म्हणजे श्री गौरीचे आधी पूजन करावे लागते. म्हणजे तुमच्या श्री गणेश तत्वाने आधी तुम्हाला स्वत:मधील कुंडलिनीचे पूजन करावे लागते. म्हणजे आपल्यामध्ये अबोधिता असायला हवी. आपल्याला आश्चर्य वाटेल की, ज्यावेळी आपले कुंडलिनीचे जागरण होते त्यावेळेला श्री गणेशतत्त्याचा सुगंध संबंध शरीरात पसरतो.

पुष्कळांना विशेषत: सहजयोग्यांना ज्या वेळेला कुंडलिनीचे जागरण होते, तेव्हा सुगंध येतो. कारण श्री गणेशतत्त्व हे पृथ्वीतत्त्वाचे बनविले आहे. ह्या श्री महागणेशातून पृथ्वी बनवलेली आहे. तर आपल्यामध्ये जे श्री गणेश आहेत, ते सुद्धा पृथ्वी तत्त्वातून बनविले आहेत. आता आपल्याला माहिती आहे की, सगळे सुगंध पृथ्वीतून येतात. सगळ्या फुलांचे सुगंध पृथ्वीतून येतात. त्यामुळे कुंडलिनी जागरण होताना पुष्कळांना अनेक तऱ्हेचे सुगंध येतात. इतकेच नाही तर सहजयोगी मला सांगतात की, श्री माताजी तुमची आठवण आली की, अत्यंत सुगंध येतात व तुमच्या शरीरातून पण असे सुगंध येत असतात. पुष्कळाचा कधी कधी गैर समजूत होते की, श्री माताजी काहीतरी अत्तर लावतात, पण तसे नाही. जर तुमच्यामध्ये श्री गणेश तत्त्व जागृत असले तर सुगंध येत असतो. तऱ्हेतऱ्हेचे सुगंध माणसाच्या अंगातून येत असतात. पण काही आपल्याला माहीत असतील की, असेही जगामध्ये लोक आहेत व जे स्वत:ला साधूसंत म्हणवतात आणि त्यांना सुगंध चालत नाही. स्वत:ला परमेश्वर म्हणवतात व त्यांना सुगंध चालत नाही. आपल्याकडे कोणतेही देवाचे वर्णन वाचलेत, विशेषत: श्री गणेशाचे तर तो सुगंध प्रिय आहे. इतकेच नाही तर तो कुसमप्रिय आहे व तो कमलप्रिय आहे तसेच श्री विष्णूच्या वर्णनात लिहिलेले आहे श्री देवीच्या वर्णनात लिहिलेले आहे. त्याचा अर्थ असा आहे की, ज्या लोकांना सुगंध प्रिय नाही व ज्यांना सुगंध चालत नाही, त्यांच्यात काहीतरी भयानक दोष आहे ते परमेश्वराच्या विरोधात आहेत. त्यांच्यात परमेश्वर शक्ती नाही हे अगदी हमखास. ज्या माणसाला सुगंध मुळीच चालत नाही. त्यांच्यात काहीतरी परमेश्वराच्याविरोधातील तत्त्वे बसलेली आहेत, हे नक्की कारण सुगंध पृथ्वीतत्त्वातले महान तत्त्व आहे. योगभाषेमध्ये त्याला अनेक नावे आहेत. पण सांगायचे म्हणजे असे की, जी कार्य पंचमहातत्त्व आहेत आणि त्यांच्या आधी त्याची जी काय प्राणतत्त्वे आहेत, त्या प्राणतत्त्वातला आद्य किंवा प्रथम म्हणजे सुगंध. त्या तत्त्वानीच आपली पृथ्वीही झालेली आहे. त्या प्राणतत्त्वानेच घडवलेला हा श्री गणेश आहे. तेव्हा श्री गणेशाचे पूजन करताना, पहिल्यांदा आपण स्वत:ला सुगंधीत केले पाहिजे म्हणजे काय की आपआपले जीवन हे अति सूक्ष्मातून सुगंधित झाले पाहिजे. बाह्यत: वरून जितका मनुश्य दुष्ट असेल, वाईट असेल तितकाच तो दुर्गंधी असतो. आमच्या सहजयोगाच्या दृष्टीने असा मनुश्य दुर्गंधी होय. वरून जरी त्याने सुगंध लावला असला तरी तो मनुष्य काही सुगंधी नाही. सुगंध असा असला पाहिजे की, मनुष्याला आकर्षक वाटले पाहिजे. एखाद्या माणसाजवळ जाऊन आपण उभे राहिलो आणि जर आपल्याला त्या माणसाबद्दल सुप्रसन्न वाटले आणि पावित्र्य वाटले तर तो मनुष्य खरा सुगंधित आहे नाहीतर दुसरा असा मनुष्य असेल की, ज्याच्यातून संपूर्ण लालसा आणि घाणेरड्या प्रवृत्या बाहेर वहात आहत, अशा माणसाजवळ जाऊन जर आपण उभे राहिलो, तर बरे वाटणार नाही. परंतु अशा माणसाला बघून काही काही लोकांना बरेही वाटत असेल, तर हे त्यांच्या दुष्ट प्रवृत्तीवर अवलंबून आहे. पण ते लोक काही श्री गणेशतत्त्वातले नाहीत.

श्रीगणेशतत्त्वाचा मनुष्य हा अत्यंत सात्त्विक असतो. त्या माणसामध्ये एकतऱ्हेचे विशेषक आकर्षण असते. त्या आकर्षणात एवढे पावित्र्य असते की, ते आकर्षणच माणसाला सुखी ठेवते. आता आकर्षणाच्या कल्पनासुद्धा फार विक्षिप्त झाल्या आहेत. त्याला कारण असे की माणसांमध्ये श्री गणेशतत्त्व राहिले नाही, जर माणसात श्रीगणेशतत्त्व असले तर, आकर्षण सुद्धा आपल्या श्रीगणेशतत्त्वावर असते. सहजच आहे, जिथे आपले आर्कषण आहे, ते तत्त्व आपल्यात असल्याशिवाय तिथे आपले आकर्षण कसे होणार.

पण आजकालच्या आधुनिक काळात जर तुम्ही पावित्र्याच्या गाष्टी केल्या, तर आपले जे मोठमोठाले बुद्धीजीवी लोक आहेत त्यांना मुळीच पटत नाही. त्यांना वाटते ह्या काही तरी जुन्या कल्पना अहेत आणि ह्या जुन्या कल्पनावरून हे नका करू, ते नका करू, असे नाही केलं पाहिजे, तसे नाही केले पाहिजे अशा रितीने तुम्ही लोकांना कंडिशनिंग (Conditioning) करता आणि तसे करून मग मनुष्य वाईट मार्गला लागतो. आता सांगायचे म्हणजे असे की माणसामध्ये पावित्र्य आईवडिलांच्या संमतीने येते. पहिल्या प्रथम ती आईच जर पवित्र नसली, तर मुलाचे पवित्र असणे फार कठीण आहे. पण एखादा असा जीव असतो की, अत्यंत वाईट मार्गाला लागलेल्या बाईच्या पोटीसुद्धा तो जन्माला येतो. आणि तो एवढ्यासाठीच येतो की, त्या बाईचा उद्धार करावा आणि स्वत: तो फार मोठा जीव असतो. मोठा पिंड असतो आणि विशेष पुण्यवान आत्मा त्या ठिकाणी जन्माला येतो. म्हणजे असेच की, जसे घाणीत कमळ फुलाव तसा तो मनुष्य जन्माला येतो, असे मी पाहिलेले आहे. असे जरी असले तरी ही म्हणजे एखादी अपवादात्मक गोष्ट आहे. स्वभावत: जर आई पवित्र असली, तर मुलगा किंवा मुलगी हे पवित्रपणाला फार सोप्या रितीने पोहोचतात. किंवा फार सहजपणे त्यांना पवित्रपणा लाभतो.

पावित्र्यामध्ये आईचे जे मूल्य असेत, ते म्हणजे तिला आपल्या पतीसाठी पहिली निष्ठा असायला पाहिजे जर श्री पार्वतीला श्री शंकराची निष्ठा नसती तर तिला काही अर्थ आहे का ? श्री पार्वतीला श्री शंकराशिवाय काहीच अर्थ नाही. ती श्री शंकराहून जरी शक्तिशालीनी वाटली तरी ती शक्ति शंकराची आहे. श्री सदाशिवाची ती शक्ती जरी असली , तरी सुद्धा ती पहिल्यांदा शंकराला शरण गेली

आहे. तेव्हाच ती शक्ती शालिनी मानली गेलेली आहे. पण ती त्याची शक्ती आहे. परमेश्वराचे किंवा देवतांचे वेगळे असते. आणि माणसांचे अगदी वेगळे असते माणसांना हे समजायचेच नाही. त्यांना हे समजतच नाही की, नवऱ्याचे आणि बायकोचे इतके पटलेले की, त्यांच्यात दोन भागच नाही. जसा काही चंद्र आणि चंद्रिका किंवा सूर्य आणि सूर्याचे किरण तसा एकपणा माणसाला समजतच नाही. माणसाला असे वाटते की, बायको आणि नवरा यांच्यात भांडणे ही झालीच पाहिजेत. जर भांडणे नाही झाली, तर काहीतरी अनैसर्गिक गोष्ट आहे. एकंदरीत एक अत्यंत पवित्र बंधन नवऱ्यात आणि बायकोत किंवा आपण म्हणून श्री सदाशिवात आणि श्री पार्वतीत होते व त्यांचा पुत्र हा श्री गणेश श्री पार्वतीने नुसत्या आपल्या पावित्र्यानी जन्माला घातला. म्हणजे त्यांच्यात तिने बापाचाही भाग घेतलेला नाही म्हणजे नुसत्या आपल्या पावित्र्याने व आपल्या संकल्पाने तिने श्री गणेशाला जन्म दिलेला आहे. केवढी मोठी गोष्ट आहे, तिच्या पावित्र्यात ! ते संकल्पाने तिने हे सिद्ध करून दिलेले आहे.

सहजयोगातसुद्धा आमचे जे काही पुण्य असेल, ते आम्ही पणाला लावलेले आहे. त्या पुण्यांनी, ज्या लोकांना व जितक्या लोकांना जन्म देता येईल तितक्यांना द्यायचा असा आमचा आपल्या जीवनाचा. आम्ही हाच एक अर्थ काढलेला आहे. पण तरीसुद्धा कुणी श्री माताजी देवी आहेत वगैरे वगैरे म्हणणे म्हणजे झाले. तसे म्हणायचे नाही. तसे का म्हणायचे ? ते कशाला हवे ? असे म्हटलेले लोकांना अगदी आवडत नाही. तुम्ही जर म्हणालात तर त्याचा त्यांना रागच येतो. आणि आपल्यापेक्षा कुणी उच्च आहे असे म्हटले की, राग येणे अगदी माणसाच्या मनाला नैसर्गिक असते. देवी म्हटले की लोकांना राग येणारच. पण लबाड लोकांनी आपणा स्वतःला देवता किंवा भगवान म्हटले तर मात्र लोक त्यांच्यापुढे अगदी डोके टेकतात. त्यांना मग ते अगदी भगवान वाटतात. कारण त्यांना भुलवायचे कसे, ती प्रेतविद्या, भूतविद्या व स्मशानविद्या अशा सर्व संमोहनविद्या ते वापरतात. तेव्हा माणसांचे डोके चालत नाही. ते कामातून जाते. त्यांना अगदी नागवे करून जरी नाचवले किंवा त्यांना अगदीच पैशांनी वगैरे जरी नागवे केले तरी चालेल. पण त्यांना भगवान म्हणतील. पण जे खरे आहे ते मिळवावे लागते आणि जर ते आपल्याला मिळाले, तर समजेल की, त्याला काय अर्थ आहे. आणि का असे म्हणावे लागते ? व का असे मानावे लागते ? ते मी आज सांगणार आहे. म्हणजे श्री गणेशाला जर तुम्ही देवच नाही मानले तर तुमचे काहीही चालू शकत नाही. पण ते प्रत्यक्षात दिसत नाही म्हणून लोकांना कळत नाही. म्हणजे एक डॉक्टरसुद्धा घरी श्री गणेशाचाच फोटो ठेवेल. त्याला कुंकू लावेल अथवा त्याला टिळा लावेल. आणखीन जर त्याला मी सांगितले की श्री गणेशतत्त्व हे तुमच्या शरीरामध्ये स्थित असते. तुम्हाला त्यांनी शारीरिक फायदा होता, तर कधीही तो मानायला तयार होणार नाही. पण त्याला मी सांगितले की, तुम्ही श्री गणेशाचे फोटो काढून ठेवा तर तेही मानायला तयार होणार नाहीत. पण जर मी म्हटले श्री गणेश तत्त्वाशिवाय तुम्ही चालू हलू शकत नाही तर ते ही गोष्ट मानायला तयार नाहीत. आता देवत्त्व आपण मानत नाही पण श्री गणेशाचे सहजयोगात हमखास मानावे लागते. त्याला कारण असे आहे की, जो काही त्रास तुम्हाला जर ह्या श्री गणेश तत्त्वामुळे झालेला असेल तर मात्र तुम्हाला श्री गणेशालाच आळवावे लागते. म्हणजे असे आहे की, तुमच्यामधले श्री गणेश रूसले की, तुमच्यातले श्री गणेशतत्व बिघडते व तुम्हाला प्रोस्टेट ग्लॅन्डचा त्रास व युटरसचा कॅन्सर वगैरे होतो. श्रीगणेशतत्त्वाला जर तुम्ही नीट वाढवले नाही, तर म्हणजे तुमच्या मुलाला नीट वागवले नाही तर, जर तुमच्यामध्ये मातृत्व नसले तर, ह्या सर्व गोष्टीमुळे युटरसचा कॅन्सर होतो. तर श्रीगणेशतत्त्वाचे काही काही फार अगदी पवित्र नियम आहेत. ते जर तुम्ही पाळले नाही तर तुम्हाला असे त्रास होतात. पण हा त्रास एक डॉक्टर श्रीगणेशतत्वाशी लावू शकत नाही. परंतु त्याचा संबंध श्रीगणेशाशीच आहे. ते तो लावू शकत नाहीत. तो इथपर्यंत येतो की, प्रोटेस्ट ग्लॅन्ड खराब झाली आहे. किंवा फार तर पेल्व्हिक प्लेक्सिस (Pelvic Phlexes) खराब झाले आहे. पण त्याच्या मागे जे परमेश्वराचे कार्य आहे किंवा ह्याच्या अंतरज्ञानाचे किंवा परोक्षज्ञानाने जे जाणले जातात किंवा ज्याला म्हटले पाहिजे की बाह्य ज्ञानापासून अलग आहे, जे तुम्हाला दिसत नाही. त्यासाठी तुमच्याजवळ अजून डोळे नाहीत त्यासाठी अजून संवेदना आलेली नाही, अजून तुमची परिपूर्ती झालेली नाही. तेव्हा तुम्ही कसे लक्षात घेणार की, हा त्रास श्री गणेशतत्त्वाच्या बिघडल्यामुळे झाला आणि श्रीगणेश आमच्यात रागावलेला आहे. तेव्हा त्या दैवताला प्रसन्न केल्याशिवाय आम्ही सहजयोग करू शकत नाही. असे म्हटल्याबरोबर ते डॉक्टर एकदम घसरले. श्रीगणेशाचे नाव घेतल्याबरोबर डॉक्टर एकदम घसरतातात की, आम्ही श्रीगणेशला मानायला तयार नाही. आम्ही फक्त विज्ञानच मानतो. मग बघा. तुमचा कॅन्सर वगैरे त्रास श्रीगणेशतत्त्वाला मानल्याशिवाय ठीक होणार नाही. श्रीगणेशतत्त्व बिघडल्यामुळे कॅन्सर होतो. श्रीगणेशतत्त्व जर आपल्यामध्ये बिघडले, कारण ते श्री गणेशतत्त्व हरएक ठिकाणी प्रत्येक अणू-रेणूत सगळीकडे संतुलन बघत असते. आता आम्ही कॅन्सर ठीक करतो. केला आहे आणि करणार. पण आमचा काही हा धंदा नाही. तेव्हा श्रीगणेश तत्त्व किती महत्त्वाचं आहे, त्याला किती महात्म्य द्यावे तेवढे थोडे आहे.

हे अत्यंत सुंदर असे चार पाकळ्यांचे श्रीगणेशतत्त्व आपल्यामध्ये असते. आणि ह्या चार पाकळ्यांच्या श्री गणेशतत्त्वामध्ये बसलेला मधोमध श्रीगणेश जे आहेत ते आपल्यामध्ये असतात म्हणजे आपल्या शरीरात त्याच्यातले एक एक अंग आहे त्याला चार अंगे आहेत. त्यापैकी पहिले अंग म्हणजे मानसिक अंग. मानसिक अंगाचे जे बीज आहे ते श्रीगणेशतत्त्वाचे. इच्छाशक्ती म्हणजे जी डावीकडची शक्ती आहे व जी आपल्याला सगळ्या भावना देते, त्या भावनेच्या मुळातच श्रीगणेश बसले आहेत म्हणजे ज्या माणसाला वेड लागले असेल, त्याचे श्रीगणेशतत्त्वच खराब असले पाहिजे. त्याचा अर्थ असा नाही की, तो मनुष्य अपवित्र आहे. पण त्याच्या पवित्रतेला धक्का लागला असावा. पवित्रतेला कुणी ठेच मारली, तरच तसे त्याला होऊ शकते. एखाद्या माणसाला जर दुसऱ्या माणसानी खूप छळले, तरी त्यांचे

श्रीगणेशत्व बिघडू शकते. कारण त्याला असे वाटते परमेश्वर आहे, जर श्रीगणेश आहेत तर मग ह्या माणसाचा ते वध का नाही करत ? असे प्रश्न त्या माणसाला उभे झाले की, हळूहळू त्याची डावी बाजू खराब झाली म्हणजे मग त्याला वेड लागायची पाळी येते. आता बघा की श्री गणेशतत्त्वाचे किती संतुलन असते. जर तुम्ही कितीही परिश्रम केले आणि कितीही त्रास घेतला आणि जर बुद्धीने पुष्कळ मेहनत केली आणि पुढचा विचार केला, प्लॅनिंग (Planning) केले, (आजकालच्या लोकांना हा एक आजार लागलेला आहे जरा बुद्धीने विचार करण्याचा) म्हणजे फार विचार सुरू झाला आणि त्या विचारामध्ये जर संतुलन राहिले नाही, तर तुमची डावी बाजू एकदम कामातून जाते म्हणजे थिजून जाते. आणि उजवीबाजू जास्त वाढू लागते, त्यामुळे डावी बाजूचे जेवढे रोग आहेत, ते श्रीगणेशतत्त्व बिघडल्यामुळे होतात. पैकी मधुमेह हा रोग श्रीगणेशतत्त्व बिघडले म्हणजे होतो. श्रीगणेशाची जी संतुलन व्यवस्था आहे तो रोग ठीक करण्यासाठी आपले लक्ष मधुमेहाकडे श्री गणेश घालतात. असा मनुष्य लगेच कमी काम करू लागतो. त्याचप्रमाणे हृदयविकारसुद्धा. जर तुम्ही अत्यंत डोक्याचे काम केले तर, हृदयविकार होतो. कारण श्री गणेशचे स्वस्तिक आपल्या शरीरात बनविलेले असते ते असे. म्हणजे दोन वातीसारख्या दिसणाऱ्या शक्ती ह्या एकात एक अशा मिळतात. पैकी डावीकडून जी अशी शक्ती येते, ही म्हणजे महाकालीची शक्ती उजवीकडून येते. ती महासरस्वतीची. मधोमध जिथे त्यांचो मीलनबिंदू आहे, तो मीलनबिंदू मात्र महालक्ष्मी शक्तीच्या मधल्या उभ्या रेषेत आहे. डावीकडची सिंपथेटीक नर्व्हस सिस्टीम (Sympathetic Nervous System) जी आहे ती महाकालीच्या शक्तीने चालते म्हणजे इच्छाशक्तीने चालते. आता एखाद्या माणसाच्या इच्छेविरुद्ध फार कार्य झाले आणि त्याला फार त्रास झाला,त्याच्या कोणत्याही इच्छा पूर्ण झाल्या नाहीत, तर त्याला वेड लागते. नाहीतर त्याला हृदयविकाराचा झटका येतो.

म्हणजे वर सांगितलेले सगळे रोग माणसाच्या अतिविचारामुळे होतात. आणि त्याचे संतुलन श्री गणेश आणून देतात. हे श्री गणेशाचे कार्य आहे. म्हणून तुम्ही पाहिले असेल की, लोक जरी घाईत असले तरी श्री गणेशाचे देऊळ दिसले तर नमस्कार करून घेतात तेवढ्यातल्या तेवढ्यात सिद्धिविनायकाला सुद्धा किती रांग लागते. पण त्याला काही अर्थ आहे का ? ते करून तेव्हाच फायदा होईल, जेव्हा तुमच्यामध्ये आत्म-साक्षात्कार आलेला आहे. जर तुमच्यांत आत्मसाक्षात्कार आला नाही, तर तुमचे परमेश्वरांशी कनेक्शन जुळणार नाही. कोणचा खोटा गुरू आहे, कोणचा खरा गुरू आहे हेही तुमच्या लक्षात येणार नाही, म्हणजे  हे बीज तुमच्यामध्ये जे श्री गणेशाचे आहे ते कुंडलिनी उठल्यावर, कुंडलिनीला सगळ्यात प्रथम श्री गणेश समजून सांगतात व ही कुंडलिनी दाखवते की या गृहस्थाला कसले त्रास आहेत ?

एखाद्याला समजा लिव्हरचा त्रास आहे, तर ती तिथे जाऊन धप् धप् करेल. तुमच्या डोळयांनी दिसते. जर नाभिचक्र धरलेले असेल किंवा नाभिचक्रावरती पकड असली तर नाभिचक्राच्या जवळ कुंडलिनी जेव्हा उठेल, तेव्हा तुमच्या डोळयांनी तुम्ही तिचे स्पंदन अथवा धप्धप् बघू शकाल. ती त्याठिकाणी एखाद्या माणसाला जर समजा भूत बाधा असेल, तर सबंध पाठीवरती ती अशी धपधप् करेल. तुम्हाला आश्चर्य वाटेल. आम्ही त्याच्यावरती फिल्म घेतलेली आहे. तुम्हाला ती धडपड तिथे स्पष्ट दिसू शकते. कुंडलिनी आमच्यामुळे जागृत होते. ह्याच्याबद्दल काही शंका नाही. कुंडलिनी उठते, पण जर श्री गणेशतत्त्व खराब असले, तर ते श्री गणेश परत तिला खाली ओढून घेतात. ती वरपर्यंत आली तर परत धपकन् खाली जाणार म्हणजे प्रथम श्री गणेशतत्त्व तुम्हाला सुधारले पाहिजे.

कुंडलिनी जागृत झाली म्हणजे हातात थंड वारा यायला पाहिजे. काही लोकांच्या अंगात कमालीची गरमी असते. ती श्री गणेशतत्त्व बिघडल्यामुळे होते. दिल्ली जवळच्या एका माणसानी मला तार केली की कोणत्यातरी विकृतीमुळे तो इथून तिथे असा धावत असायचा, जसे काही त्याला हजार विंचू चावून राहिले आहेत. ते म्हणाले, श्री माताजी महिन्यापासून मी असा छळाला गेलोय. मला विंचू चावून राहिल आहेत. तेव्हा मी म्हटले बसा दोन मिनिटे तरी त्यांना अगदी धीर धरवेना. तेव्हा मी त्यांच्याजवळ गेलो व पाच मिनिटांत त्यांना शांत केले. कारण ही पृथ्वीमाता जमिनीवर उभे होते. ते तुम्ही आज जमिनीवर बसलात. मला फार आनंद झाला. आज अगदी बरोबर सबंध योग जुळलेला आहे त्या पृथ्वीमातेने त्यांची सबंध उष्णता ओढून घेतली. आता तुम्ही कसे पृथ्वीमातेला सांगणार की, हे पृथ्वीमाते, तू माझी सबंध गरमी ओढून घे. ओढूनच नाही घेणार ती पण सहजयोग्यातील ती ओढून घेते. त्याला कारण असे आहे की, एकदा ते श्री गणेशतत्त्व तुमच्यात जागृत झाले, तर तेच तत्त्व या पृथ्वीत असल्यामुळे, त्याच तत्त्वावर ही पृथ्वी चालत असल्यामुळे ती अगदी ओढून घेते. व म्हणूनच आपल्यामध्ये ते तत्त्व जागृत ठेवले पाहिजे. व ते पवित्र ठेवले पाहिजे. माणसांनी. इतकेच नाही तर सहजयोगमध्ये मग तो सहजयोगी जो पावित्र्याचा पुतळा व त्याला चालवणारा जो राजा श्री गणेश आहे. त्या देशामध्ये (शरीरामध्ये) जो राज्यकर्ता आहे. अशा श्री गणेशाला 'त्रिवार' नमस्कार करून आणि त्याचे श्री गणेशासारखे आपल्यामध्ये पावित्र्य आणण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे.

आता ज्या गोष्टी सांगू नयेत आणि जे लोक सांगत आहेत, त्याबद्दल पुष्कळ वाच्यता झाली आहे आणि अशा रीतीनी पुष्कळ तांत्रिकांनी सुद्धा आपल्या देशामध्ये आक्रमण केले आहे. त्यांचे आक्रमण राजकीय नसले तरी इतके अनैतिक आणि इतके घातक आहे की, त्यांचे आपण आज भोग, उचलून राहिलो आहोत. या तांत्रिकांनी सगळा घाणेरडेपणा सहाव्या शतकांत अतिशय केला. त्याला कारणे अशी की, त्या वेळचे राजे म्हणजे फार खुशाल चेंडू अशा लोकांच्या पैशावरती तांत्रिकांनी चैन केली. जास्त पैसा झाला म्हणजे मात्र हेच होते. आधी पाहिले श्री गणेशतत्त्व खराब करा. पैसा जर अति झाला म्हणजे तो श्री गणेशतत्त्वाच्या पाठी लागतो. तरुण मुलींच्या मागे लागणे, लहान अबोध मुलींच्या मागे लागणे, ते त्यांच्यात श्री गणेशतत्त्व झोपल्याचे द्योतक आहे. हे तांत्रिकसुद्धा लोक काय करतात,

त्यांच्यातही तेच आहे की कोणतीही अवोधिता दिसली की त्याला हाणायचे. कुणीही अबोध मनुष्य दिसला की त्याला मारायचे. आपलीच अबोधिता खतम करून घ्यायची यावरून असे दिसते की हे विलासी लोक परमेश्वरापासून दूर राहिले. तसेच अनेक कर्मठ लोक ज्यांनी परमेश्वराकडे जाण्याचा आटोकाट प्रयत्न करून परमेश्वर मिळविलेला नाही. आपल्यामध्ये विलासीप्रमाणेच कर्मठ लोक फार आहेत. कर्मठता आपल्यात कमी नाही. महाराष्ट्रात तर फारच कर्मठता. म्हणजे सकाळी सत्रादा हात धुतले पाहिजे. कुणी सांगितले माहीत नाही. तर त्या बाईनी जर सोळादा धुतले अन् सतरा वेळा धुतले नाही तर अजिबात तिला झोप येणार नाही. काहीतरी अमुक इतक्या वाती वळल्याच पाहिजे. अमुक लाख जप केलाच पाहिजे. पण जे केले पाहिजे ते मात्रहोत नाही. म्हणजे वाती वळायच्या आणि त्यावेळेला आपल्या सुनेच्या किंवा मुलीच्या काहीतरी वाईट गोष्टी सांगत बसायचे असे आपल्याकडे प्रकार आहेत. त्यामुळे सांगायचे म्हणजे असे की, सहजयोग हा अशा लोकांत रुजणार नाही. येऱ्यागबाळयाचे काम नोहे. श्री रामदासांनी सगळी आमच्या कार्याची पूर्वपिठीका सांगितली आहे. जर तुम्ही दासबोध वाचला तर आम्हाला मुळीच तुम्हाला काही सांगायला नको. त्यांनी हे सगळे सांगून ठेवलेले आहे. आणि तेच खरे आहे. ज्या माणसामध्ये ती कुवत असते आणि जो खरोखर त्या पट्टीचा असेल, त्याच माणसाला खरोखर सहजयोग साधेल. सगळ्यांना साधत नाही. म्हणजे चैतन्यलहरी येतील. पार व्हाल. पण त्यांत रूजणारे थोडे. अशा आम्ही हजारो लोकांना जागृती दिली. कारण लोकांची दृष्टीच मुळी उलटीकडे जाते. तर आपण आता जागे झाले पाहिजे. वेळ आली आहे. तशी जर आता सहजयोग झाला नाही तर हा परमेश्वराच्या घरचा निवाडा आहे. हे तुम्ही जाणून घेतले पाहिजे. आता चालायचे नाही असे. आताच तुम्ही पार होऊन घेतले पाहिजे. पुढे जे काही होणार आहे तिथे पुन्हा संधी मिळणार नाही. पुढे काय होणार आहे ? त्यावेळी 'एकादशरुद्र' येणार आहेत. एकादशरूद्र म्हणजे अकरा रूद्र. एकच रूद्र ह्या संबंध विश्वाला संपविण्यासाठी समर्थ आहेत. पण जेव्हा अकरा रूद्र येतील तेव्हा तुम्ही त्याची कल्पना करू शकत नाहीत. ते अगदी संबंध संपवून टाकतील त्याच्या आधी ज्या लोकांचा निवाडा व्हायचा आहे तो निवाडा आताच सहजयोगानी झाला पाहिजे. आणि लोकांनी घेतला पाहिजे. पण बहुतेक लोकांचे असे असते की लहान लहानशा गोष्टीत लोक बिथरतात आणि लहान लहानशा गोष्टीवरून निघून जातात. पैकी जर आम्ही एखादे पैसेबिसे घेत असतो आणि एखादी भोंदूगिरी वगैरे केली, तर लोकांना जसत आवडेल.

म्हणजे मनुष्याच्या अहंकाराला पुस्टी दिली तर मनुष्य यायला तयार असतो. पण सहजयोगामध्ये हे सांगायचे झाले तर हे सगळे काही परमेश्वराचे कार्य आहे. हे सहज घडते त्याला पैसा लागत नाही. एका फुलातून जसे फळ निघते तसेच तुमचे सुद्धा होणार आहे. आणि जसे तुम्हाला नाक, डोळे, तोंड आणि ही मानवस्थिती आलेली आहे, तसेच अतिमानव स्थिती परमेश्वरावरच तुम्हाला ही एक सिथती म्हणन देत आहे. हे दान आहे परमेश्वराचे. परमेश्वर तुम्हाला देणार आहे. तुम्ही या बाबतीत काही बोलू शकत नाही. ही भूमिका मानायला मनुष्य मुळी तयार होऊ शकत नाही. त्याला एवढा अहंकार झालेला आहे. त्याला वाटते डोक्यावर जोपर्यंत मी दहा दिवस उभा राहू शकत नाही. तोपर्यंत मला काही मिळणारच नाही. आधी हे लक्षात घेतले पाहिजे की, ज्या परमेश्वरांनी अशा अनंत गोष्टी ठेवलेल्या आहेत, त्या आपण काहीही करू शकत नाही. कोणतेही जिवंत कार्य आपण करू शकत नाही. तिथे आपण करू शकत नाही. तिथ आपण अतिमानव तरी कसे होऊ ? तोच करणार. पण एवढेच होते की, पार झाल्यावर फक्त मनुष्ययोनीतच मनुष्याला समजते की, आपण पार झालो ही पहिली गोष्टी. दुसरी त्याच्यात ती शक्ती येते की, ज्यामुळे तो दुसऱ्यांना पार करू शकतो. त्याच्यातून ती शक्त वाहते. तो एक एक असा अनेक होऊ शकतो. म्हणजे त्याला देवत्व प्राप्त होते. तो स्वःत देवत्वात येतो. आता असे पुष्कळसे लोक आहेत. ज्यांनी चांगले चांगले गुरू वगैरे केलेले आहेत. गुरू मोठमोठाले आहेत. पण त्यांच्या शिष्यांमध्ये देवत्त्व आलेले मी पाहिलेले नाही. त्यांच्यात परिवर्तन झालेले नाही ते जिथे आहेत तिथेच आहेत. कारण शिष्य जरी झाले तरी, शिष्य भयामुळे किंवा श्रद्धांनी पूर्ण अजून ते घटीत झालेले नाहीत. ती घटना घडलेली नाही. ते परिवर्तन आतुन झालेले नाही. म्हणजे यांचा जर गाभाच ठीक करायचा असला किंवा फुलाचे फळ करायचे म्हटले, म्हणजे संबंधच बदलते. अशी स्थिती मात्र कोणाला आलेली नाही, तेव्हा सांगायचे असे आहे की, त्यासाठी आपल श्री गणेशतत्व जागृत व्हायला पाहिजे. त्याला आपण आधी सांभाळले पाहिजे.

आजकालच्या काळामध्ये नानातऱ्हेचे आपण सिनेमा, नाटके बघतो. त्यांच्या जाहिराती पाहतो व वाचतो आणि काही काही जाहिराती म्हणजे संबंध अश्लिलपणा आणि संबंध अपवित्रपणा त्यात भरलेला व हे जे आता शहरामध्ये झाले आहे, ते खेडयात पण गेले आहे. आता त्या अपवित्रतेने त्यांचा सर्वनाश झालेला आहे. त्यामुळे काही इतक्या दुःखात पडलेत की, आता रात्रंदिवस ह्याच योजना करत बसलेत की, आता आम्ही आत्महत्या कोणत्या प्रकारची करावी. ही त्यांची सिथती झालेली आहे. तेव्हा तुम्ही त्या मार्गाला जाताना एकटेच विचार करून बघितला पाहिजे. तसेच रूढीप्रिय लोक प्रतयेक गोष्ट आपण का हे सगळे करत आहोत. आपण मानव स्थितीला आलो आहोत, तर याचा अर्थ लावला पाहिजे. आयुष्यभर तेच तेच करण्यात काही अर्थ नाही. जसजशी मंडळी परमेश्वराला तत्त्वतः सोडून निघाली तसतशी ही मंडळी परमेश्वराच्या नावाला नुसती चिकटून आहेत. सकाळपासून देवाला दिवा दाखवला, घंटी मारली की झाले. त्या रितीनी वागणारे किंवा जे मी काहीच्या कर्मठपणाबद्दल सांगितले, अशा तऱ्हेची जी कर्मठ मंडळी आहेत. त्यांनी समजून घेतले पाहिजे की अशा तऱ्हेच्या फुकाच्या गाष्टींनी परमेश्वर कदापि मिळणार नाही. परमेश्वर आपल्यामध्ये आहे. तो जागृत केला पाहिजे. जर कुंडलिनी ही आई आणि श्री गणेश ही त्यांची कृति आहे आणि श्री गणेश हे तिचे मूळ आहे. आपल्यामध्ये असलेली कुंडलिनी श्री गणेशच्या नुसत्या हातावर फिरत असते. श्री गणेशाच्या हातात काय असते ते तुम्ही पाहिले

असेल. तसेच त्यांच्या पोटावर सर्प बांधलेला असतो किंवा पुष्कळवेळा त्याच्या एका हातामध्ये सर्प असतो. म्हणजे गणेशाला तसे म्हटले तर चारच हात आहेत पण खरे म्हणजे त्यांना अनंत हात आहेत. जो हातामध्ये सर्प दाखवतात, तीच ही कुंडलिनी. तसेच आमच्या सहजयोग्यांचे आश्चर्याची गोष्टी की, सहजयोगी हे जर पार होत आहेत. त्यांच्या नुसत्या हातावर कुंडलिनी चढते ह्यांनी हात असा वर केला म्हणजे दुसऱ्यांची कुंडलिनी वर जाते. म्हणजे आता लहानसा सहजयोगी मुलगासुद्धा कुंडलिनी वर उचलतो. दोन दोन वर्षाची मुले, पाच-सहा वर्षाची मुले सुद्धा तुम्हाला सांगतील, तुमची कुंडलिनी सध्या कुठे अडली आहे ते. तिची काय स्थिती आहे. माझी नात सात आठ महिन्याची होती तेव्हा हे श्री मोदी माझ्या कडे आले होते आणि त्यांचे आज्ञाचक्र धरलेले होते. तर बोलता बोलता तिला काही समजेना. ती अशी रांगत होती तरी तेवढ्यात ती हातामध्ये माझा कुंकवाचा करंडा घेऊन आली आणि त्यांच्या कपाळाला कुंकू लावले आणि त्यांचे आज्ञाचक्र तिने सोडवून टाकले. सारखी तिला हीच आवड असते. तेच मी माझ्या इतर सहजयोग्यांच्या लहान लहान मुलांमध्ये पण पाहिलेले आहे. कित्येक जन्मजात पार आहेत. जन्मजात, म्हणजे केवढी मोठी ही गोष्ट. म्हणजे साक्षात जन्मजात पार मंडळी आज संसारामध्ये जन्माला येत आहेत. त्याच्यासाठी संन्यास घ्यायला नको. संन्यास वगैरे घ्यायची ज्याला गरज वाटते त्याला मात्र अजून पार होता आले नाही. पार झाल्यावरती तुम्ही आतून आपोआप सुटत जाता. असे सुटत गेल्यामुळे संन्यास बाहेरचा काही घ्यायला नको. संन्यास घेतला म्हणजे आतून घेतला असला, तर त्याचे प्रदर्शन व जाहिराती लावायची काय गरज आहे ? जर तुम्ही पुरुष असला, तर चेहऱ्यावर बघूनच लोक सांगतील हा पुरुष आहे की बाई. त्याच्या काय जाहिराती लावून फिरता की काय आम्ही पुरुष आहोत. आम्ही बायका आहोत. तशातलाच हा प्रकार आहे. की संन्याशी तुम्ही मनानी झालात रखूप काहीतरी असले, तरी आतून ह्या देहात ऐहिक पारमार्थिक सुख, समाधानही वगैरे सहजयोगामध्ये सहज गाठता येते. त्याला संन्यास वगैरे घेण्याची काहीही गरज नाही. श्री शंकराची जी स्थिती आहे किंवा श्री शंकरांनी जी स्थिती प्राप्त करून घेतली आहे त्याला सुद्धा जसे श्रीगणेश निर्माण करावे लागले. तसे तुम्हालासुद्धा ते श्रीगणेश निर्माण करायला पाहिजे.

पूर्व म्हटल्याप्रमाणे, पाश्चात्त्य देशांमध्ये मूर्खपणाच्या नवीन नवीन कल्पना काढून त्यांनी त्यांच्या जीवनातील अबोधिता कशी काढली आहे ते पहा. ते म्हणतात, मुलांनी मुळी सडपातळच राहिले पाहिजे. धष्टपुष्ट होता कामा नये. कारण त्यांचे आदर्श म्हणजे सिनेमातले नट व नटी होय. तसेच तिर्थ सर्व प्रकारची सुबत्ता असून सुद्धा तिथले लोक लहान मुलांना प्रेम सर्वार्थाने देत नाहीत. लहान मुल जन्माला आल्यावर मला, आश्चर्य. वाटते, ते हे की, त्याची आई भारतीय आईप्रमाणे त्याचे प्रेमाने संगोपन न करता त्याला दुसऱ्या खोलीत टाकून देते. म्हणून बालपणात तेथील मुलांना आईचे वात्सल्य व प्रेमळ मिळत नाही.

गम्मत बघा. तिथल्या भाषेमध्ये दूडदूड धावणे ह्या क्रियेला प्रतिशब्दच नाही. लहान मुलांना बघतात तरी का ते धावताना ! आपल्याकडे दूडदूड धावणे हा वात्सल्य रस. आपल्याकडे श्रीकृष्णाचे अथवा श्रीरामाचे लहानपणाचे वर्णन वाचताना अगदी कौतुक वाटते. परंतु तुम्हाला त्यांच्या भाषेमध्ये श्री येसुख्रिस्ताचे लहानपणचे वर्णन मिळणार नाही.

श्री गणेश तरी काय किंवा श्री गणेशतत्त्व तर काय ? पवित्रता म्हणजे काय ? मीच म्हणजे सर्व काही आहे असे समजतो व त्याच्यातले हे श्री गणेशतत्त्व नष्ट पावते. पण त्यातले एक सुंदर उदाहरण म्हणजे संन्यास घ्यायचा आणि लग्न करायचे नाही. घराच्या बाहेर रहायचे आणखी कुणशी संबंध ठेवायचा नाही. ते सुद्धा हे दुसरे लोक आहेत. श्रीगणेशतत्त्व जर आपल्या जागृत असले, तर संसारात राहूनच परमेश्वर मिळवता येतो आणि जर देवत्व मिळवायचे असेल, तर संसारात राहिले पाहिजे. ब्रम्हर्षिपद मिळू शकेल. जर तुम्ही अगदी फारच कडक अगदी तीव्र वैराग्य आचरले तर. पण मला असे आता वाटायला लागले आहे की, ब्रम्हर्षी सुद्धा एवढे मोठे पोहचलेले आहेत, मी यांना ओळखते, पुष्कळसे लोक आहेत पण ते आता काही करायला तयार नाहीत - मी त्यांना एवढी आंतरिकता नाही आणि इतकी ते मेहनत करायला तयार नाहीत. मला कधी कधी वाईट वाटते आणि त्याचे असे मत आहे की, जे हे त्यांचे भक्त आहेत, त्या भक्तांची अजून तयारी नाही. जर मेहनत केली तर आपण तयारी करू शकतो आणि त्याला पुढे आणू शकतो. पुष्कळदा मला असे वाटते की, हे सगळेजण जर आता माझ्या मदतीला आले तर बरे होईल. मला फार मानतात. असे एक गृहस्थ आहेत कलकत्त्याजवळ त्यांचे नाव श्री ब्रम्हचारी म्हणून आहे. आणखी ते फार पोहोचलेले आहेत. आणि त्यांनी माझ्याबद्दल एका अमेरिकन माणसाला सांगितले की, श्री माताजी साक्षात् आल्यावर आम्ही आता बघत बसलो आहोत त्यांचे काम. आम्हाला हेच कार्य करायचे आहे व बाकीचे काही राक्षसाचा नाश वगैरे आम्ही मनन शक्तीने करतो आहो असे ते सांगत. पण ते गृहस्थ इथे आल्यावर मी त्यांना म्हटले की, तुम्ही अमेरिकेला का नाही जात? ते अमेरिकेला गेले, परंतु तेथून पाच दिवसातच पळाले आणि मला म्हणाले, मला अशा लोकांना भेटायचे नाही. ते अगदी घाणेरडे लोक आहेत. म्हणजे ह्या श्री ब्रम्हचारीसारखे लोक स्वतः माणसात न राहिल्यामुळे अगदी माणूसघाणे झाले आहेत असे म्हटले तरी सुद्धा तुम्ही फार तर फार त्यांच्या चरणावर जाल. त्यांच्यावर श्रद्धा ठेवाल, त्यामुळे तुमची स्थिती सुधारेल यात शंका नाही. पण मग तुम्हाला आत्मसाक्षात्कार कसा होणार ? कारण त्यासाठी हात घालावा लागतो. मुळी- मुलाला ठीक करायचे, मुलाला सांभाळायचे आहे तर आईला घाणीतच हात घालावा लागतो. जर ती घाण घाण करत असेल, तर मुलाला स्वच्छ कोण करणार आहे ? आणि म्हणूनच हे आईचे कार्यआहे. आणि आईचेच कार्य सहजयोगासाठी आम्ही करतो आहोत आपण सर्वांनी त्यामध्ये न्हावून घ्यावे, त्याच्यामधील आनंद उचलावा. हीच एक आईची इच्छा आहे. आईची एकच इच्छा असते की,

आपल्यात असलेली शक्ती मुलात यायला पाहिजे. जोपर्यंत जनसाधारणाना ज्याचा फायदा होत नाही, जोपर्यंत जनसाधारण मानव त्याच्यातून काही मिळवू शकत नाही, जोपर्यंत त्याच्या मुलाला त्याच्या शक्त्या मिळत नाहीत, अशा आईचा उपयोग काय ? अशा आई असल्यापेक्षा नसलेल्या बऱ्या. तेव्हा ज्या व्यक्तीला आई किंवा गुरू मानतात, आपल्यापेक्षा मोठे मानतात, त्यांनी जर स्वतःचा अर्थ लावलेला नाही तर त्यांच्या जीवनाचा तुम्हाला तरी काय आदर्श मिळणार आहे? सहजयोगामध्ये 'स्व'चा अर्थ लागतो. 'स्व' चा अर्थ म्हणजे तुमच्या आत्म्याचा अर्थ लागतो.

मूलाधार चक्राधार श्री गणेशाचे स्थान कसे आहे, त्याच्यात कुंडलिनीचे आवाज कसे होतात आणि कुंडलिनी कशी फिरते. नंतर प्रत्येक पाकळ्यामध्ये कसे तऱ्हेतऱ्हेचे रंग आहेत आणि ते कशा रीतीने पाकळ्यामध्ये राहतात आणि ते कसे शोषण करून घेतात वगैरे बरेच आहे. त्याच्यामध्ये आणि ते ज्ञान सगळे तुम्हाला मिळाले पाहिजे आणि ते मिळणार. आणि काहीही आम्ही त्याच्यातले लपवून ठेवणार नाही. प्रत्येक गोष्ट आम्ही तुम्हाला सांगायला तयार आहोत. पण तुम्हाला सुद्धा पार होऊन पुरुषार्थ करायला पाहिजे. जर तुम्ही तुरुपार्थ केला नाही, तर तुम्हाला काहीही फायदा होणार नाही.

आता पूजेमध्ये काय करावे हा प्रश्न लोकांना असतो. श्री

माताजी, श्री गणेशाच्या पूजेला काय करावे ? कारण आम्ही परोक्ष विद्या जाणतो. जे तुम्हाला दिसत नाही, त्याला नानकानी 'अलख' म्हटले आहे. त्या डोळ्यांनी आम्ही बघतो. तेव्हा आम्हाला सांगायचे आहे, पहिल्यांदा पावित्र्य तुमच्यात आहे का ते बघा. आंघोळ वगैरे करणे हे तर झालेच. त्याचे काही नाही. ते नाही केले तरी चालेल पण एक मुसलमान सुद्धा श्रीगणेशपूजा फार छान करतो. आपल्याला आश्चर्य वाटेल अल्जिरियाचे, जवळ जवळ पाचशे मुसलमान सहजयोगी आहेत तरूण मुले-मुली पार झालेले आहेत. पण त्यातला जो मुख्य आहे, त्याचे नाव आहे श्री. जमेल आणि तो श्रीगणेशपूजा इतकी सुंदर करतो. ते अगदी बघण्यासारखे आहे आणि श्रीगणेशाला ठेवून, स्वतः त्यांची छान पूजा करतो. म्हणजे सहजयोगामध्ये हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन सगळेच येतात आणि त्यापेक्षा त्यांच्या अनेक देवता कशा सहजयोग्यता आहेत ते दाखवले आहे. आता हे श्रीगणेशतत्त्व आहे. ते आज्ञाचक्रावर आल्यावर श्री येसुख्रिस्त या स्वरूपात या संसारात आलेले आहेत देवी महात्म्य म्हणजेच देवी भागवत जे श्री मार्कंडे यांनी लिहिले आहे ते तुम्ही वाचा. त्यातील श्री महाविष्णुवरील वर्णन वाचा. त्यांनी सांगितले आहे की, राधेने स्वतःचा पुत्र तयार केला होता. म्हणजे जसा पार्वतीने केला होता. पण श्री गणेशतत्त्व हे त्यांच्यात मुख्य तत्त्वापैकी आहे. आणि त्या श्री गणेशतत्वावर आधारीत, त्यांनी जो पुत्र तयार केला होता, तो ह्या संसारात श्री येशु ख्रिस्त म्हणून आला. आता ख्रिस्त ! कारण राधेने तयार केला, म्हणून कृष्णाच्या नावाने तो श्री ख्रिस्त आहे. आणि यशोदा आहे तिथे म्हणून येशू आणि अशा रितीने त्यांनी हे जे श्री गणेशतत्त्व आहे त्याचे जे पूर्णपणे उद्घाटन केले, ते श्री ख्रिस्त स्वरूपात केलेले आहे. म्हणून हे लोक जे आपल्याला ख्रिश्चन म्हणून म्हणवतात, त्यांना हे आधी माहीत नाही की, हे श्री येशूख्रिस्त आधी श्री गणेशच होते आणि श्री गणेशतत्त्वाचा हा प्रादुर्भाव आहे आणि तोच आता श्री एकादशरूद्रामध्ये कसा येणार आहे. पण सांगायचे असे आहे की, 'आज्ञा चक्रावर' श्री गणेश गेल्यावर, जे परशू हातात ठेवून जे मूळाधार चक्रावर श्री गणेश मुगळ्यांना धाड् धाड् मारत होते, ते ह्या ठिकाणी क्षमेचे एक साधन झालेले आहेत. क्षमा करणे हे मानवाला सगळ्यात मोठे साधन आहे. क्षमा करणे हे साधन असल्यामुळे त्याला हातात तलवार नको, काही नको. नुसती जर त्यांनी लोकांना क्षमा केली, तर त्यांना काहीही त्रास होणार नाही आणि म्हणूनच आजच्या ह्या काळामध्ये, आम्ही सहजयोगामध्ये आपले जे आज्ञाचक्र धरते, तेव्हा सांगतो की, सगळ्यांना क्षमा करा आणि त्यांनी किती फायदा होतो, ते अनेक लोकांना माहीत आहे. आणि सहजयोगातल्या लोकांनी ते मान्य केलेले आहे आणि त्यांनी पाहिले आहे, कारण सगळे काही सहजयोगात प्रत्यक्षात आहे जर तुम्ही क्षमा नाही केली, तर तुमचे आज्ञाचक्र सुटणार नाही. तुमची डोकेदुखी जाणार नाही. व तुमचा ट्युमर खाली येणार नाही. म्हणून क्षमा ही केलीच पाहिजे. कारण जोपर्यंत नाक धरले नाही, तोपर्यंत मनुष्य गोष्टीला तयार होत नाही. म्हणूनच हे सगळे आजार आलेले आहेत असे मला वाटायला लागले आहे. कारण जोपर्यंत माणसाला अगदी कितीही समजावून सांगितले तरी तो एकावर एक आपली शक्कल काढत असतो. याला काहीतरी दुसरा अर्थ आहे. तर तुमचा अर्थ अजून लागलेला नाही. तुमचे अजून नेमके तारायंत्रण लागलेले नाही, तेव्हा ते लावून घ्या. आधी आत्मसाक्षात्कार करून घ्या. हेच आमचे सांगणे आहे. त्यात काहीतरी शक्कल काढू नका. जे काही विचारांनी, निदानानी किंवा पुस्तक वाचन होत नाही. ते आतून आले पाहिजे. ते झाले पाहिजे. ही घटना झाली पाहिजे. काहीवेळेस इतके महामूर्ख लोक असतात. विशेषतः शहरात, खेडेगावात नाही. ते म्हणतात, अहो आमचे कुंडलिनी जाग्रण झालेच नाही ! बघा आम्ही कसे ? म्हणजे फारच उत्तम तुम्ही अगदी ! काय विचारता ? अहो तुमचे कुंडलिनी जाग्रण झाले नाही, म्हणजे काहीतरी मोठा दोष आहे तुमच्यात. शारीरिक असेल, मानसिक असेल, बौद्धिक असेल तो काढून घ्या. ते काही चांगले नाही. स्वच्छ झाले पाहिजे. स्वच्छ झाल्यावरच आनंद येणार आहे. असे मनामध्ये समजून घेतले. म्हणजे सगळे ठीक होईल. आता या पैकी जो अहंकाराचा भाग आहे, तो मात्र श्री गणेशाच्या चरणी आज अर्पण करावा. श्री गणेशाला प्रार्थना करावी की, आमचा अहंकार घे. असे तुम्ही जर त्यांना आज म्हटलेत तर माझ्यासाठी फारच आनंदाची गोष्ट होईल. कारण श्रीगणेशासारखा पुत्र सर्वांना असावा असे आम्ही सांगतो आणि त्याच्या नुसत्या नावानी आमचे संबंध शरीर अगदी चैतन्यलहरींनी वाहू लागते अशा सुंदर गणेशाला नमन करून आजचे भाषण संपवते.

★

# श्री भैरवनाथपूजा

**श्री माताजी निर्मला देवी यांचे भाषण कार्लट इटली ता. ८.४.९९**

आज श्री भैरवनाथांची पूजा करण्यासाठी आपण येथे जमलो आहोत. इडानाडीवर खालीवर जाणाऱ्या भैरवनाथांचे महत्व आपल्याला समजलेले नाही असे मला वाटते. इडानाडी ही चंद्राची नाडी आहे. म्हणून आपल्याला थंड करण्याचा हा मार्ग आहे. भैरवनाथांचे महत्व आपल्याला थंड करण्यात आहे. उदा. तापट स्वभाव हा अहंकार व गरम लिव्हर यांच्यामुळे असतो. जर व्यक्ती तापट स्वभावाची असेल तर भैरवनाथ त्याला खाली पाडण्यासाठी युक्ती करतात. रागावण्याचा फोलपणा चांगला नव्हे हे दाखविण्यासाठी श्री हनुमानांच्या मदतीने सर्व काही योजून आणतात. डाव्या बाजूचे लोक, किंवा खिन्न झालेले लोक यांना श्री हनुमान निःसंशय त्यातून बाहेर पडण्यास मदत करतात. पण श्री भैरवनाथ सुद्धा त्यांना बाहेर निघण्यास मदत करतात.

आता, जी व्यक्ति डावीकडे असते ती सामूहिक बनू शकत नाही, अशी व्यक्ति जी खूप दुःखी, काळजीत, खिन्न असते, जी सामूहिकतेमधील आनंद अनुभवू शकत नाही त्या व्यक्तिला फार कठीण जाते, तर तापट, उजव्या बाजूकडची व्यक्ति कोणालाही सामूहिकतेचा आनंद उपभोगू देत नाही. पण स्वतःच्या प्रगतिसाठी सामूहिकतेत राहाण्याचा प्रयत्न करते. अशी व्यक्ति स्वतःचे वर्चस्व दाखविण्याचा प्रयत्न करते. त्यामूळे सासूहिकतेचा आनंद उपभोगू शकत नाही. त्याऊलट जी व्यक्ति नेहमी खिन्न असते, कोणी माझ्यावर प्रेम करत नाही, कोणाला माझी काळजी नाही असा विचार करीत दुसऱ्यांकडून काही अपेक्षा करीत असते, तीसुद्धा सामूहीकतेचा आनंद उपभोगू शकत नाही. अशा प्रकारची डाव्या बाजूची व्यक्ति सर्व गोष्टित दुःखच शोधते. सर्वात उणेपणा शोधणाऱ्या उणेपणाच्या दृशीकोनामुळे आपण डावी बाजू खराब करून घेतो.

श्री भैरवनाथांच्या हातांत नेहमी प्रकाश असतो आणि इडानाडीमध्ये वरखाली तिथे काहीही निगेटीव्हीटी नाही हे पाहाण्यासाठी ते धावत असतात. निगेटीव्हीटी आपल्याकडे अनेक मार्गाने येत असते. एक प्रकार म्हणजे हे माझे आहे. जसे, माझे मूल, माझा नवरा, माझी प्रॉपर्टी एकदा तुम्ही अशाप्रकारे चिकटला की तुमची मुलेसुद्धा निगेटीव्ह झालेली तुम्हाला आढळून येईल. पण तुम्हाला पॉझिटिव्ह व्हायचे असेल तर ते सोपे आहे. त्यांसाठी तुमचे चित्त कुठे आहे ते तुम्हाला पाहीले पाहीजे. त्यात तुम्हाला कांही प्रश्न आढळतो आहे की कांही मजा आढळते आहे? प्रत्येक निगेटीव्हीटीमधील पॉझिटिव्हीटी उपभोगण्याची सहजयोग्यांची क्षमता आहे. निगेटिव्हीटी अस्तित्वांत नसते ते दुर्लक्ष असते. दुर्लक्षही अस्तित्वात नसते. जर सर्व काही ब्रह्मचैतन्य आहे, तर तेथे दुर्लक्ष कसे असेल? पण समजा या शक्तिच्या घडीमध्ये तुम्ही लपला आणि पळू लागला तर तिथे निगेटिव्हीटी आहे असे तुम्ही म्हणाल. जसे, तुम्ही स्वतःला गुहेत लपविले, ती घट्ट बंद केली आणि म्हणाल, सूर्यच नाही.

जे लोक सामूहिक होऊ शकत नाहीत ते डाव्या किंवा उजव्या बाजूकडील असतात. बहुतांशी डावीकडील, बंधुत्वाने वागणाऱ्या दारुड्यांच्या संघटनांप्रमाणे डावीकडचे लोक निगेटिव्हीटीमध्ये सामूहिक होऊ शकतात. याचा अंत ते वेडे होण्यात असतो तर उजवीकडील लोकांचा अंत हे मूर्ख होण्यांत असतो.

जर सहजयोगी सामुहिकतेत येऊ शकत नसेल तर तो सहजयोगी नाही असे समजावे. अंधारात भैरवनाथ आपल्याकडा उजेड देतात याचा अर्थ आपल्यामधील सर्व भूतांचा व भुताटकीच्या कल्पना यांचा ते नाश करतात, श्री भैरवनाथांचा श्री गणेशांशी पण संबंध असतो. श्रीगणेश मूलाधारावर आहेत आणि श्री भैरव डावीकडे जाऊन मग उजवीकडे जातात. त्यामुळे सर्व प्रकारच्या कंडीशनींग्ज संस्कार सवयींवर श्री भैरवांच्या मदतीने करु शकतो.

नेपाळमध्ये श्री भैरवांचा एक मोठा स्वयंभू पुतळा आहे. लोक जास्त डावीकडे आहेत त्यामुळे श्री भैरवांना घाबरून आहेत. जर एखाद्याला चोरी करण्यसाची वाईट सवय असेल तर श्री भैरवांपुढे दिवा ठेवून आणि त्यांच्याबरोबर गुन्हा कबूल करून ते त्यांची मदत घेतात. लबाडी लुचीच्या गोष्टी करण्यापासून सुद्धा श्री भैरव रक्षण करतात. आपल्याला जे वाटते ते आपण गुपचूप करतो आणि लपवू शकतो. पण श्री भैरवांपासून तुम्ही काही लपवू शकत नाही. तुम्ही बदलत नाही तर तुम्हाला ते पूर्णपणे उघडकीस आणतात. त्याप्रकारेच त्यांनी त्या भयंकर खोट्या गुरूंना उघडकीस आणले.

श्री भैरवांना नंतर श्री महावीर म्हणून पृथ्वीवर अवतार घेतला. लोकांना नरकांत पडण्यापासून थांबविण्यासाठी ते नरकाच्या दारावर उभे असतात. पण तुम्हाला जर नरकांत जायचे असेल तर म्हणतात ठीक आहे जा. आपल्या निगेटीव्हीटीशी झगडून, दुसऱ्यांवर प्रेम करणारे, त्यांचा आनंद लुटणारे, व आनंदात रमणारे लोक होणे चांगले. लोक तुम्हांला काय करीत आहेत त्याची काळजी न करता तुम्ही दुसऱ्यांसाठी काय भले करू शकता त्याचा विचार करणे चांगले. श्री भैरवनाथांची आपण प्रार्थना करू या की आम्हाला हसण्याची आनंदात रममाण होण्याची संवेदना द्या.

★

# प्रथम स्वत:ला समजून घ्या

पोर्चेस्टर हॉल लंडन 1.8.89

सर्वप्रथम आपण हे समजून घेतले पाहीजे की सत्य म्हणजे जे काही आहे ते आपल्याला कल्पनेत मांडता येत नाही. जुळवाजुळव करता येत नाही. अथवा स्वतः उपयोगासाठी वापरता येत नाही. शिवाय घोडयांप्रमाणे दोन्ही बाजूला झांपडे लावली असल्यामुळे आपल्या सर्व कंडिशनिंग्जमुळे (संस्कारामुळे) सत्य आपल्याला सापडत नाही. आपल्याला स्वतंत्र लोक बनले पाहीजे. शास्त्रज्ञांप्रमाणे आपल्याला खुल्या मनाची माणसे झाले पाहिजे. सत्य काय आहे ते पाहण्यासाठी, कोणीतरी काही प्रतिपादन केले. व्याख्यान दिले, उघडपणे सांगितले तर डोळे झाकून स्वीकारू नये. शाश्वताला शोधणे हे सर्व धर्मांचे मूलतत्व आहे. आणि अशाश्वत क्षणभंगूर गोष्टींना त्यांच्या मर्यादित त्यांना समजून घेऊन उपयोगात आणावे. त्यामुळेच आपले संतुलन ढळले आहे. आपण खरोखर असे लोक असू की ज्यांना सत्य काय आहे ते जाणून घ्यायचे आहे, तर आपल्याला हे समजले पाहीजे की मानवी जाणीवेमध्ये आपल्याला हे समजू शकत नाही. ती एक कल्पना होते. आपल्याला अध्यात्मिक स्तरावर संवेदना प्राप्त केली पाहीजे. अध्यात्मिक पायरी म्हणजे आत्म्याची जाणीव होय. आत्म्याची जाणीव ही एक अवस्था आहे ज्यांत तुम्ही आत्मा बनता. हे कृत्रिमतेने कोणाला सर्टिफिकेट देणे नव्हे की तुम्ही हिंदु, ख्रिश्चन, मुसलमान किंवा दुसरे काही झालात. यातील काहीही तुम्हाला थांबवू शकत नाही, तेव्हा या सर्व काही गोष्टी इतक्या वरवरच्या झाल्या आहेत की आता असे लोक झाले आहेत की त्यांनी देव अस्तित्वात नाही असे म्हणावयास सुरूवात केली आहे. धर्म वगैरे काही नाही, हे सत्य नाही.

प्रथम तुम्ही म्हणता देव नाही. तुम्ही पाहा की तुम्ही त्यासाठी शोधण्याचा प्रयत्न केला आहे का? की आपल्या अहंकाराच्या आहारी जाऊन देव नाही असे आपण म्हणत आहोत? देव आहे किंवा नाही हे बघण्याचा प्रयत्न आपण केला आहे का? देवाविषयी बोलणाऱ्या लोकांना पारखून तुम्ही देवाला पारखू शकत नाही. कोणीही देवाबद्दल बोलू शकते. कारण त्यांना पकडणारा कुठलाही कायदा नाही असे त्यांना वाटते ते त्याच्या बाजुने बोलू शकतात. त्याच्या विरूद्ध बोलू शकतात, त्यांना वाटेल ते करू शकतात. देवांच्या आणि सर्व प्रेषितांच्या विरूद्ध बोलून ते पैसाही करू शकतात.

म्हणून प्रथम आपल्याला थोडे स्वावलंबी व्हायला पाहीजे. स्वतंत्र व्हायला हे कळायला की तुम्हाला आत्मा समजला पाहीजे- स्व:ला समजले पाहीजे. आणि ते स्वतःच्या स्वयंचलित मध्य मज्जासंस्थेवर समजले पाहीजे. जसे हे गरम आहे, हे थंड आहे असे कळते, तसेच सगळीकडे पसरलेली दैवी शक्ति तुम्हाला समजली पाहीजे. हीच सत्य आहे, हीच सत्याचे प्रकटीकरण करते, कारण ते ईश्वराचे प्रेम आहे. ती तुम्हाला तुमच्या मध्य स्वयंचलित मज्जासंस्थेवर कळली पाहीजे. तोच बोध आहे.

आपण असे म्हणू शकतो की पश्चिमेकडे आम्ही फार प्रगती केली आहे. किंवा प्रत्येक गोष्टीच्या बाबतीत खूप पुढे गेलो आहोत. पण तुम्ही पहातच आहात, शास्त्राबरोबर तुम्ही सुरुवात केली आणि तयार केले? हायड्रोजन बॉम्ब-अणुबॉम्बआणि सर्व प्रकारचे आपल्या डोक्यावर बसलेले राक्षस. कोणताही उद्योग आपण घेतला तर आपण त्याच्या अतिरेकापर्यंत जातो. संतुलन काहीच नसते. मनाची झेप सरळ रेषेत असते. ती एकाच रेषेमध्ये पुढे जाते व येते. आणि तुम्हाला गुदमरून टाकते. (गळचेपी करते) आता तुम्हाला "ॲसिड रेन" मिळाला आहे. तुम्ही यंत्रे तयार केलीत. यंत्रे तुमच्यासाठी आहेत. तुम्ही यंत्रासाठी नाही. याप्रकारे तुम्ही आणि यंत्रे यात काही संतुलन उरले नाही. तुम्ही आणि शास्त्र यात काही संतुलन उरले नाही. हातात जे मिळेल ते घेऊन वेडयासारखे धावत सुटणे यासारखेच हे आहे आणि जेव्हा तुम्ही आत्मा होता तेव्हा हे संतुलन तुम्हाला मिळते. हे सुरेखप्रकारे तयार केलेले झुंबर तुम्ही पहा. पण त्यात प्रकाश नसेल तर त्याला काही अर्थ नाही. त्याचप्रकारे तुमच्या चित्तावर आत्म्याच्या प्रकाश प्रज्वलित झाला नसेल तर तुम्हाला तुमचा अर्थ कळणार नाही. हा मायक्रोफोन मुख्य विद्युतवाहिनीला जोडला नसेल तर निरूपयोगी आहे. आपण मुख्य परम तत्वाला जोडले गेली

नाही तर आपल्याला परमात्मा कळणार नाही. आणि म्हणून हे सर्व प्रश्न आहेत. आपल्यामध्ये असलेल्या यंत्राबद्दल जेव्हा मी बोलते तेव्हा हे मूळाबद्दलचे गहनतेचे ज्ञान आहे हे समजले पाहीजे. त्यासाठी तुम्ही अत्यंत गहन व्यक्ति झाली पाहीजे. उथळ मनाने तुम्ही ते पाहू शकत नाही. गहन व्यक्ति व्हायला तुम्हाला मुळे जाणून घेतली पाहिजेत. मानवाच्या प्रत्येक उद्योगांत काहीतरी कुठेतरी चुकले आहे. धर्मामध्येसुद्धा त्यामुळे हल्ली या प्रकारचा फार्स चालत असलेला आपल्याला दिसतो आणि आपल्याला शाश्वत शोधावयाचे आहे. कदाचित हे थोडेसे वेगळे दिसेल. उदा. बुद्ध आणि महावीर देवाबद्दल काहीच बोलले नाहीत. मी सुद्धा चार वर्षे देवाबद्दल काही बोलले नाही. तुम्ही जेव्हा देवाबद्दल बोलता तेव्हा लोक उडया मारू लागतात की आम्ही केव्हा देव होणार? तेव्हा तुम्ही प्रथम ''स्व'' (आत्मा) व्हा. ही पहिली पायरी. ते म्हणाले पहिल्यांदा तुम्ही स्व व्हा. जोपर्यंत तुम्हाला तुमचे डोळे नाहीत तोपर्यंत तुम्ही रंग कसे पहाणार? जे मिळण्याची तुमची पात्रता आहे, जे तुमचे स्वतःचे आहे, मानव म्हणून तुमचा जो जन्मसिद्ध हक्क आहे, ते तुम्ही मिळवावेत तुमच्या हिताचे आहे आणि ते म्हणजे आत्मा. आणि ते म्हणजेच सहजयोग. सह म्हणजे बरोबर. ज म्हणजे जन्मलेला. हा योग मिळविण्याचा हक्क तुमच्या बरोबर जन्मलेला आहे. (योग - देवाशी ऐक्य) माणूस म्हणून हा तुमचा जन्मसिद्ध हक्क आहे. उत्क्रांतिचे शिखर तुम्ही आहात आणि हे घडले पाहीजे. पण कृपा करून तुमची हृदये उघडा, तुमची मने उघडी करा आणि स्वहितासाठीच पहा. मला माहित आहे, हे घडणार आहे. पण त्याबद्दल विचार करून तुम्ही त्याची कल्पना करू शकत नाही. आपल्या शोध घेण्यामध्ये हा सर्वात मोठा प्रश्न आहे की कोणत्या तरी एका कल्पनेच्यामागे आम्ही धावत सुटतो.

आत तुम्ही यंत्र पाहीले आहे. उत्क्रांतीच्या क्रियेत आपल्यामध्ये तयार केलेले हे सर्वात सुरेख यंत्र आहे. पहिले एक चक्र सर्वात सुंदर आहे. कारण ते अबोधितेचे प्रतिक आहे. ही अबोधिता हीच एक आपल्याला खरा आधार, खरी ताकद देते. ती छायेत झाकली असेल, दगाळलेली असेल, कदाचित तुम्ही एक निराशाजनक स्थितीमध्ये असला. काही लोक म्हणतील की आमची अबोधितता आम्ही नष्ट केली आहे. तुम्ही काहीही केले असेल, पण हे एक असे चक्र आहे ज्याचा कधीही नाश होऊ शकत नाही. त्या केंद्राबाबतीत तुम्हाला दोष असतील. पण त्याचा नाश होऊ शकत नाही. हे इतके आश्चर्यमय चक्र आहे ज्याला चार पाकळ्या आहेत. त्या पेल्व्हीक प्लेक्ससची काळजी घेतात.

आपल्या स्वातंत्र्यात आपण सर्व प्रकारच्या गोष्टी ज्या आपल्याला हितकारक नसतील, अशा करतो. काही हरकत नाही. कुंडलिनीचा नाश करता येत नाही. तो मूळ स्तोत्र आहे जो तुम्हाला तुमचा आत्मसाक्षातकार देणार असतो, मी म्हणते, ती तुमची वैयक्तिक आई आहे. आणि ही आई प्रेमळ आई आहे. आणि तिला तुमच्या पूर्वायुष्यांची प्रत्येक गोष्ट माहीत असते. तीफक्त संधीची वाट पाहाते आहे की तीची जागृती होईल आणि तुम्हाला ती दुसरा जन्म देईल. ती दैवीमाता आहे. ती तुम्हाला त्रास देणार नाही. पण ज्या लोकांना अधिकार नाही, शिक्षण नाही, कुंडलिनी काय आहे हे माहीत नाही. त्या लोकांकडून हे त्रास उद्‌भवीत आहेत.

कुंडलिनी तुम्हाला कधीच त्रास देणार नाही. उलट ती जेव्हा वर येते तेव्हा तुम्हाला तुमची जागृति मिळते. त्यावेळी पहिली गोष्ट प्रस्थापित होते ती म्हणजे निर्विचार समाधी. कारण विचार येतो आणि लय पावतो आणि कुंडलिनी विलंबात दोन विचारांच्या मध्ये तुम्हाला वर्तमानात थांबविते व वर्तमानात वाढू देते. तुम्हाला जर विचार करायचा असेल तर तुम्ही करू शकता. तुम्हाला विचार करायचा नसेल तर करू नका. कुंडलिनी जेव्हा आज्ञाचक्र भेदन करून वर जाते त्यावेळी हे घटीत होते.

तर दुसऱ्या चक्रामध्ये काय होते तिचे जेव्हा आगमन होते तेव्हा तुम्ही प्रभावी बनता कारण दुसरे चक्र हे सौंदर्याभिरूचि व निर्मितीचे आहे. माझा भाऊ जो चार्टर्ड अकाउंटंट आहे सर्व भाषांमध्ये तो खूप मागे होता. आता तो संस्कृत आणि उर्दूत कविता करतो. मराठीत सुद्धा जी खूप कठीण भाषा आहे. जेव्हा कुंडलिनी वर चढते तेव्हा ती त्या चक्राचे पोषण करते. एखाद्या सुरेख आईप्रमाणे ती त्याचे पोषण करते. आत्मसाक्षात्कारानंतर अमजादअली मोठे कलाकार झाले. कारण कुंडलिनी वर येते आणि निर्मिती ही इतकी प्रभावी, विलक्षण, कार्यक्षम बनते आणि त्याचवेळी व्यक्ति खूप गोड, दयाळू, सौम्य होते.

तेव्हा ही हिंसक वृत्ती, हा राग, हा संतापी स्वभाव ही तुमची कृती नाही. ही तुमच्या लिव्हरची कृती आहे. जेव्हा असा संतापी स्वभाव असतो तेव्हा काय करावे हे तुम्हाला कळत नाही. दारूड्या व्यक्तिप्रमाणे तुमचे व्यक्तिमत्व असते. आपल्याला आवडेल ते करायचे. पण हा सर्व स्वभाव इतका थंड व सुरेख बनतो. असा चैतन्यमय माणूस इतका दयाळू असतो ही खूप आश्चर्याची गोष्ट आहे. आता ते असे सुद्धा म्हणतात की ठराविक देशांच्या विशेष प्रकारच्या स्वभावाच्या छटा असतात. सर्व काही विरघळून जाते. कारण हे चक्र इतके सृजनशील आहे आणि ते शुद्ध

विद्येचे प्रकटीकरण देते. त्यामुळे तुम्हाला तुमच्या मध्य मज्जासंस्थेवर कळू लागते. तुम्हाला बोटांच्या टोकांवर कळू लागते. जसे कोणीतरी माझ्याकडे आले व मला म्हणाले - माझी आज्ञा पकडली आहे, त्याचा अर्थ माझा अहंकार वाढला आहे. कोणी असे म्हणेल का? जर तुम्ही कोणाला सांगितले तुला अहंकार झाला आहे तर त्यांना अहंकार झाला आहे हे तुमच्यावर दाखवून देतील ते. तुम्हाला अहंकार झाला आहे हे कोणाला सांगणे धोकादायक आहे. पण आत्मसाक्षात्कारामुळे तुम्हाला कळते की इथे आणि मी ते ओलांडू शकत नाही कारण तिथे बाधा आहे ती मला काढून टाकली पाहीजे.

हे तुमच्या इतके अंतर्यामात आहे आणि एकदा संबंध जुळला की तुम्हाला तुमच्याबद्दल कळते, आणि या चक्राबद्दलसुद्धा वेगवेगळया विचित्र आणि घाणेरडया विचारांना निर्माण करणारे हे चक्र इतके हितकारक, सुखदायी, सुरेख बनते. त्याशिवाय हे लोक ज्यांना एक शब्द हिंदी येत नव्हते त्यांनी संस्कृतात गायला सुरुवात केली आहे. म्हणजे सहजयोगामध्ये आल्यावर आजचा झगडणारा कलाकार उद्या महान कलाकार बनू शकतो. तरीपण मी म्हणते व तिथे मोह आहेत. तुम्ही एक महान कलाकार व्हाल, तुम्ही आणखी पैसे मिळवाल वगैरे. पण तुम्ही ज्याच्यासाठी समाधानी व्हावे ते हे नाही. तुम्ही कधीच समाधानी होणार नाही.

तर आता आपण तिसऱ्या चक्रावर जाऊ ज्याला आपण "नाभी चक्र म्हणतो. हे चक्र एका बाजूला जल, दुसऱ्या बाजूला अग्नी यांनी तयार झाले आहे. त्याच्याभोवती दहा व्हॅलन्सीज् आहेत. आपल्या स्वतःच्या अंतर्यामी असलेला आपला धर्म. हे नाभी चक्र किंवा सोलर प्लेक्सस, कुंडलिनी वर आली वग तिचा प्रकाश या चक्रावर पडला की आपल्याला धार्मिकता देते. एका रात्रीत लोकांनी दारू सोडली आहे. एका रात्रीत लोकांनी अंमली पदार्थ सोडले आहेत. सर्व काही आणि उत्तम भाग म्हणजे त्यांच्या सद्गुणांच्या आनंदात ते आहेत. काही लोक विचार करतात, "मग काय मजा आहे", हे काय आहे की तुम्ही गुत्त्यामध्ये काहीतरी घेता आणि दुसऱ्यादिवशी त्याचा हँगओव्हर (विषण्ण अवस्था) इथे तुम्ही काहीतरी घेता आणि दुसऱ्या दिवशी तुम्ही खूप बरे (चैतन्यमय) होता. ते कधी कमी होत नाही. त्याची कधी प्रतिक्रिया होत नाही. ते कृत्रिम नाही. त्याची नशा चढत नाही. ते तुमच्यातच असते व त्याचे तरंग बाहेर येत असतात.

इथे आपल्यामध्ये आपले औदार्य उपभोगण्याची क्षमता असते, आता सर्व जड वस्तू काहीही असली तर आपण भौतिकवादी आहोत. पण वस्तूची सौंदर्यभिरुची तुम्ही दुसऱ्यांना देऊ शकता. ज्यांत तुमचे प्रेम सूचित होते. फक्त हीच गोष्ट जड वस्तू करू शकते. आणि अशा प्रकारे हे प्रेम तुम्ही व्यक्त करू शकता. त्या व्यक्तिला आवडतील अशा भावना तुम्ही व्यक्त केल्या आहेत. अशा प्रेमळ सुरेख समाजाबरोबर या तऱ्हेची गहनता तुमच्यामध्ये तयार होते. तुम्ही गहनते मध्ये गेल्यावर तुम्हाला आणखी काही लागत नाही. कारण प्रत्येकजण तुमच्या गरजांकडे लक्ष पुरवित असतो.

तुम्ही जो दुसऱ्यांना आनंद देता ते या चक्रांतूनच. काय खायचे याची चिंता तुम्हाला नसते. तुमच्यासाठी हे चांगले आहे, हितकारक आहे ते तुम्ही खाता. तुम्ही इतके हुषार होता, शिवाय इतरांनाही खुष ठेवता. हे अन्न वाईट आहे. मला दुसरे हवे असे म्हणून दुसऱ्यांना नाखुष करीत नाही. "मला पाहीजे" निघून जाते. न पेटवलेली मेणबत्ती प्रकाशित होण्याची इच्छा करत असते त्याप्रमाणे. "मला प्रकाशित करा." पण एकदा तिला प्रकाशित केल्यावर इतरांना ती आपोआप प्रकाश देते. याप्रमाणे तुम्ही सुद्धा तुमचा प्रकाश, तुमचे प्रेम, तुमचा आनंद आपोआप दुसऱ्याला देता. कोणालाही कुठलाही "टेन कमांडमेण्टस्" मधून आता जायला नको. ते दिवस गेले आहेत. आता तुम्ही आपोआप तसे होता. खूप सुरेख, मायाळू आणि तेजस्वी लोक.

सहजयोगी मंडळींच्या चेहऱ्यावरचे तेज पहा. चेहरा किती प्रफुल्लित दिसतो. खूप लोकांच्या वयामधील दहा ते वीस वर्षे गळून पडतात आणि ते इतके उत्साही असतात. ते कधी दमत नाहीत. तुम्ही का दमता? कारण आपण खूप विचार करतो. सगळी शक्ती विचार करण्यात फुकट गेली त्यामुळे काहीही उपभोगण्यासाठी शक्ती उरली नाही. उदा. तुम्ही लोकांना रात्री जेवायला बोलावले. तुम्ही विचार करता - काय प्यायचे, जेवण कसे गरम ठेवायचे, काय करायचे वगैरे वगैरे. सर्व गोष्टींबद्दल इतके क्षोभित आणि बेचैन झाले असता की जेव्हा पाहुणे येतात तेव्हा त्यांना पळून जावेसे वाटते. कारण विचारांचे आणि योजनेचे इतके टेन्शन झालेले असते. शेवटी सर्व आनंद अदृश्य होतो.

तर दुसरे चक्र खूप चमत्कारिक गोष्टी करते. आपण विचार करताना वापरतो त्या ग्रे पेशी ते मेंदूला पुरवीत असते. शिवाय ते आपले लिव्हर, यकृत, पॅनीक्रऑस, स्वादुपिंड, स्प्लीन, प्लीहा मुत्रीपंड, किडनी आणि पोटाचा काही भाग याकडे लक्ष पुरविते. पण याऐवजी तुमच्या मेंदूकडे ग्रे पेशी पाठविण्याच्या धांदलीत असते, कारण तुम्ही विचार वेड्यासारखा करीत असता. त्यामुळे तुमच्यामध्ये

बाकीचे रोग तयार होतात. लिव्हरचे त्रास आणि मग मधुमेह (डायबिटीस), आता मधुमेह डायबेटीस खूप साखर खाल्ल्याने होत नाही. भारतामध्ये तुम्ही गावात जाऊन पहा. ते इतकी साखर घेतात की चमचा कपामध्ये उभा रहातो. पण त्याला काही डायबेटीस होत नाही. कारण तो उद्याचा विचार करत नाही. तो फक्त खूप काम करतो, जेवतो आणि झोपतो. तो झोपेच्या गोळ्यासुद्धा घेत नाही. तेव्हा जास्त विचारामुळे हा डायबेटीस होतो आणि तुम्ही सहजयोगात आला की तो सहज बरा होतो.

नंतर तिसरा जास्त भितीदायक रोग म्हणजे रक्ताचा कॅन्सर. जे लोक जास्त विचार करतात त्यांना ब्लड कॅन्सर होतो. आई बारीक सारीक तपशीलाविषयी जास्त दक्ष असेल तर मुलांना तो होऊ शकतो. तिचा गालिचा, तिचे घर सर्वांबद्दल ती इतकी दक्ष असते की उंदरानेही आत येऊ नये. पूर्णवेळ ती विचार करीत, योजना करीत असते. या सर्वांचा मुलावर परिणाम होतो. मुलालाही रक्ताचा कॅन्सर होऊ शकतो. तुमची स्लीन ही स्पीडोमीटर असते. यामुळे रक्ताचा कॅन्सर होतो. ती तुमच्या आयुष्याचा ताल असते. जेव्हा आपण पूर्णवेळ शॉकमध्ये असणारी घाईगर्दीत असणारे लोक असतो त्यावेळी ही बिघडते. उदा. वर्तमानपत्रे, कधीही चांगली बातमी देत नाहीत. किती लोकांना आत्मसाक्षात्कार मिळाला किंवा काहीतरी व्यवस्थित चालले आहे वगैरे काही नाही. पण तुमच्या डोक्याला मेंदूला धक्का बसेल असे काहीतरी. नाहीतर तुम्ही हे गंभीरपणे घेणार नाही.

तुमची संस्था फार नाजुक आहे. तिला पटकन धक्का बसतो. त्यामुळे तुम्ही नाश्ता न घेता तुमच्या गाडीत बसता किंवा कदाचित उशीर झाल्यामुळे नाश्ता तुमच्या हातात असतो. रस्त्यात ट्रॅफिक जाम असतो. तुम्ही आरडाओरड करता किंचाळता. कसेबसे तुम्ही ऑफीसमध्ये पोहोचता आणि तिथे बॉस भुंकत असतो. अशाप्रकारे आपण पूर्ण टेन्शनमध्ये राहातो. आपण स्वतंत्र लोक आहोत असे मानले जाते. रात्री तुम्ही जोरात गाऊ लागला तर शेजारी येऊन तुम्हाला पोलीस स्टेशनमध्ये ठेऊन देतो. तुम्ही काही करू शकत नाही. तिथे काही स्वातंत्र्य नसते घड्याळाने तुम्ही बांधलेले असता. या ठरावीक वेळेला तुम्हाला तिथे पाहोचले पाहीजे. या सर्व गोष्टी आपल्यावर परिणाम करतात आणि आपण घाईत असतो आणि इर्मजन्सीसाठीही स्लीन रक्ताच्या लाल पेशी पाठवत असते. पण तुम्ही नेहमीच घाईत असता तेव्हा स्लीन सुद्धा वेडीच होते. काय करावे हे तिला कळतन ाही. ती जास्त आणि जास्तच पेशी तयार करते आणि एका वेड्या माणसाला मी बांधले गेले आहे असा विचार करते, "कारण कधी काम करायचे, कधी नाही हे मला कळतच नाही." त्यामुळे आपण सहज परिणाम होइल असे होतो आणि धक्का बसला की रक्ताचा कॅन्सर होतो. तुम्ही एक महिन्यानंतर मरणार असे सर्टिफिकेट डॉक्टर देऊन टाकतात. पण सहजयोगाने बऱ्याच लोकांचे रक्ताचे कॅन्सर बरे केले आहेत. पण कुंडालिनीच्या जागरणाने या किंवा त्या बाजूला फार जास्त होणारी हालचाल जी पूर्ण वेळ चालू असते ती थांबते. कुंडालिनी त्यातून वर जाते तिला परत आणते. तिचे पोषण करते. सर्व कॅन्सर व इतर असाध्य रोगांमध्ये ही चक्रे जागेपासून दूर गेल्याने सहज परिणाम होईल अशी स्थिती आली असते.

आता आपल्याकडे हृदयचक्र आहे, ते डावी, उजवी दोन्ही बाजू संभाळते, स्टर्नम हे हाड ॲंटिबॉडीज तयार करते व त्या रोगाशी सामना करतात हे तुम्हाला माहीत आहे. हे आपल्या आईचे चक्र आहे. जेव्हा तुमच्या मातृत्त्वाला आव्हान दिले जाते तेव्हा तुम्हाला ब्रेस्ट कॅन्सर होतो. (वक्षस्थलाचा) जर पुरुष बाहेरख्याली असेल तर त्याची बायको चिंतामग्न असते. तिला ब्रस्ट कॅन्सर होऊ शकतो कारण तिच्या मातृशक्तीला आव्हान मिळाले असते आणि सुरक्षिततेच्या भावनेला तडा गेला असतो. तसेच तुम्ही खूप विचार करता, खूप उजव्या बाजूचे भविष्यवादी असता जे जे लोक खूप योजना आखतात ते दहा वर्षे पुढचे योजून ठेवतात. त्यांचा मृत्यूसुद्धा त्यावेळी कसला पोशाख घालणार त्यांना कोठे पुरण्यात येईल वगैरे. हे सर्व भवितव्याची योजना करणे शरीरामध्ये इतकी ओमिशन-१ उष्णता निर्माण करते, कारण सर्व उष्णता शोषून घेणारे लिव्हर त्याचे हया चक्राचे दुर्लक्ष होते. त्यामुळेही उष्णता वर जाते व तुम्हाला दम्याचा विकार (अस्थमा) होतो.

अस्थमा हा सहज बरा होणारा आहे. उजवे हृदय हे पती किंवा पित्याचे स्थान आहे. तुम्ही वाईट पती असाल, तुमचे पत्नी जहांबाज असेल, तुम्ही चांगले पिता नसाल, किंवा तुमचे वडील तुमच्याबाबतीत दयाळू नसतील तर तुम्हाला दमा होऊ शकतो किंवा तुम्ही तुमच्या वडिलांना क्षमा केली नसेल तरी तुम्हाला दमा होऊ शकतो. या पृथ्वीवर येताना आपण निवडलेल्या आपल्या मातापित्याशी आपले नाते मला माहीत आहे कदाचित ते चूक असतील. हट्टी असतील, जिद्दी असतील, दारूडेसुद्धा असतील. तुम्ही त्यांना सोडले तरी विसरा आणि क्षमा करा. नाहीतरी तुमच्यावरोबर तुम्ही हे प्रश्न बाळगीत राहाता.

★

# श्री कृष्णपूजा

## श्री माताजी निर्मलादेवी यांचे भाषण सारांश १४-८-८९

आज आपण श्रीकृष्ण अवताराची पुजा करण्यासाठी जमलो आहोत. श्रीकृष्ण म्हणजे श्री नारायणांचा म्हणजे श्री विष्णुंचा अवतार होय. प्रत्येक अवतारात ते आपले सर्व गुण, शक्ती आणि स्वभाव बरोबर घेऊन अवतरतात. त्यामुळे श्रीराम व नारायण यांचे सर्व गुण त्यांच्या अवतारात होते. प्रत्येक अवतरण त्यांच्या पूर्वीच्या अवतारामध्ये जे काही चुकीचे समज झाले अथवा जे अतिरेकास गेले ते सुधारण्याचा प्रयत्न करते. त्यामुळेच ते वारंवार परत येतात. श्रीविष्णू हे धर्म व सृजनता यांचे संरक्षक आहेत. त्यामुळे त्यांनी जेव्हा अवतार घेतला त्यावेळी लोक धर्माचरणाने रहात आहेत हे त्यांना पहायचे होते. व्यवस्थित राहून श्री महालक्ष्मींच्या मध्य मार्गात रहायचे असेल तर तुम्हाला तुमचा आत्मसाक्षात्कार मिळवला पाहीजे. प्रथम अवतारामध्ये त्यांनी श्री रामासारखा हितकारक राजा निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

श्री राम हे पुरुषोत्तम होते. सर्व मानवात उत्तम एक पूर्ण मानव म्हणून मानवांच्या सर्व गुणांसकट त्यांनी अवतार घेतला. त्यांनी लक्ष्मी तत्वाशी म्हणजे श्री सीताजींबरोबर विवाह केला. सर्वसाधारण वैवाहिक जीवन जगले. मग त्यांनी तिचा त्याग केला आणि तपस्वी लोकांप्रमाणे जीवन व्यतीत केले. आपल्या आयुष्यांतून त्यांनी हे दाखविले की पतीची पत्नीबरोबर वागणूक कशीअसली पाहिजे. नंतर त्यांना दुसरी भूमिका राजाची करायची होती. जेव्हा ते राजा झाले, तेव्हा त्यांना समजले की श्री सीतेला त्यांनी रावणाकडून परत आणल्यामुळे लोक त्यांच्यावर टीका करीत होते म्हणून श्री रामांनी तिला दूर पाठविले. किती सत्ताधारी लोकांना ही संवेदना असेल की त्यांच्या वर्तणुकीने त्यांनी असे उदाहरण त्यांच्या हाताखालच्या सर्व लोकांना दिले पाहिजे की ते आदर्श ठरतील. श्री सीताजी महालक्ष्मी होत्या. त्यांना समजलेही. सर्व लिला आहे आणि त्या दूर गेल्या.

राजा म्हणून श्री रामांनी लोकांना कसे राज्य करावे हे शिकवले. राजासाठी आवश्यक आदर्श त्यांनी प्रस्थापित केले. सर्वात आदर्श राज्य ''रामराज्य' होते असे म्हणतात. त्यांच्या शासनात शांती होती. चढाओढ नव्हती. प्रत्येकजण आनंदी, खूष होता कारण न्याय, धर्म, आनंद, शांती ते पसरवित होते. पण प्रत्येक अवतरणांच्या बाबतीत जे काही नैसर्गिक नाही तेच लोक उचलतात. श्री राम तपस्व्यासारखे राहीले म्हणून लोक वैराग्याप्रमाणे राहू लागले. लोक करारी झाले हसणे नाही, स्मित नाही, सर्व काही खूप गंभीर झाले, लग्न न केल्यामुळे त्यांचे संतूलन संपले. लग्न तुम्हाला संतुलित करते. त्यावेळी सर्व निर्मिती ही एक लीला आहे, मजा आहे हे दाखविण्यासाठी श्री कृष्णांनी जन्म घेतला. तिथे गंभीर, रूक्ष वैराग्याने राहाण्याचे काहीच कारण नाही. खरे तर, श्री रामांच्या आधी सर्व संत विवाह करत होते. नंतर एक विचित्र प्रकारचा ब्राह्मणवाद चालू झाला. त्यामुळे जाती व्यवस्था दुबळी झाली. कर्माऐवजी जन्मावर जात ठरवली जाऊ लागली. ब्राह्मण दुसऱ्यांवर वर्चस्व गाजवू लागले. त्यामुळे श्री कृष्णांनी गवळ्याच्या घरी जन्म घेतला.

श्रीकृष्ण फक्त पाच वर्षांचे होते तेव्हा त्यांनी खूप खोड्या केल्या आणि सर्व प्रकारच्या लीला केल्या. जसे एक मोठा, नाग त्यांनी मारला. आणि त्यांच्या शक्तीने खूप राक्षस त्यांनी त्यांच्या क्रीडेनेच मारले. श्री रामांना ते अवतार होते; हे त्यांनी जाणायला नको होते आणि जरी त्यांना वेगवेगळ्या प्रकारांनी ते अवतार होते हे दाखविले गेले तरी ते ती गोष्ट स्वीकारत नव्हते कारण त्यांना ते कळायला नको होते. काहीतरी महामायेप्रमाणे. याप्रकारेच सर्व कॅमेरे तुम्हाला खऱ्या महामायेविषयी पुरावा देत आहेत. ती कशी आहे. एखादी व्यक्ती असे दाखवित्ते, की त्यांना आठवत नाही, तुम्हाला त्याची आठवणसुद्धा नाही. कारण तुम्ही ते आठवले तर तुमच्या क्रिया मानवी नसतील, त्या दैवी लीला होतील आणि त्या कदाचित मानवांना योग्य नसतील. त्यांना ते सहन होणार नाही. ते घाबरतील. ते इतके आश्चर्यचकित होतील. त्यामुळे श्रीकृष्ण खूप साधारण व्यक्तीसारखे सर्वसाधारण (नॉर्मल) वागत होते.

बालपणी त्यांना लोणी खूप आवडत असे. लोणी विशुद्धी चक्रांसाठी अत्यंत चांगले आहे. चहामध्ये थोडे लोणी टाकून घ्या म्हणजे कोरडा झालेला घसा मोकळा होतो. आपल्या मित्रांच्या मदतीने तो सर्व भांडी फोडून सर्व लोणी खाऊन परत फस्त करीत असे आणि मग उगाच थोडे थोडे खोटे सांगत असे. त्याच्या सर्व खोड्या, गोड गोड प्रेमभावाचे वातावरण निर्माण करण्यासाठी असत. पौर्वात्य देशात लहान मुलांच्या खट्याळपणाचे सर्वांना कौतुक असते. मुलांबरोबर असणारा कडकपणा बहुतांशी आपल्या अपत्यांवर प्रेम नसल्याने असतो.

गालिचे आणि इतर जड वस्तूंवर प्रेम असते कारण ते त्या विकू शकतात. त्यांची मुले ते विकू शकत नाहीत. मुले व पालक यामध्ये जड वस्तूविषयक कल्पनांमुळे दुरावा असतो. जड वस्तू जास्त महत्त्वाच्या वाटू लागतात.

आता चोरी करणे हे खूप वाईट समजले जाते. पण श्रीकृष्ण, गौळणी ज्या मथुरेत एका राक्षसाकडे लोणी घेऊन जायच्या त्यांचे सर्व लोणी चोरत होते. हे लोणी सर्व राक्षस खाऊन खूप बलवान होत होते. त्यामुळे त्यांनी विचार केला सगळे लोणी खाऊन टाकलेले बरे म्हणजे या बायका ते तिथे विकू शकणार नाही. आणि तुम्ही याचे महत्त्व पहाल तर - फक्त थोडे पैसे असावे म्हणून आपण आपल्या मुलांना उपाशी ठेवतो. प्रत्येक गोष्ट परत विकायची असते या कल्पनेने पैशांकडे लक्ष असते. त्यामुळे मुले ही कायमची जबाबदारी होते. नुसते ओझे असल्याप्रमाणे मुलांना वागवले जाते. जर सर्व मूल्यमापन पैशांतच होणार असेल तर मुलांना कुटुंबात स्थानच नाही. सहजयोगानुसार जगाच्या सर्व संपत्तीपेक्षा मुले जास्त महत्त्वाची आहेत. त्याप्रकारेच त्यांच्याकडे लक्ष पुरवले पाहिजे. अर्थात स्वाभीमान म्हणजे काय आणि कसे वागावे हे त्यांना कळले पाहिजे. पण त्यांच्या छोट्या छोट्या खोड्या समजून घेतल्या पाहिजेत आणि उपभोगील्या पाहिजेत.

मुले म्हणूनच ती खोड्या करू शकतात. मोठी माणसे म्हणून नाही. त्यांना खोड्या करता याव्या, क्लृप्त्या करता याव्यात इतके स्वातंत्र पाहिजे. नाहीत्तर ते फार रुक्ष लोक होतील आणि वैरागीपण होतील. त्यांच्या मुलांबद्दल जे पालक कडक शिस्त बाळगतात ते कधीही नॉर्मल नसतात. एकतर ते खूप विकृत असतात किंवा ते शांत होऊन आयुष्याला तोंड देऊ शकत नाहीत. दोन्ही एकाच प्रकारचे असतात, एक आयुष्याला तोंड देऊ शकत नाहीत. आणि दुसरे जीवन त्यांना तोंड देऊ शकत नाहीत.

तुमच्या मुलांना तुम्ही अत्यंत प्रेमाने, समजुतदारपणाने वाढविले पाहिजे. पण त्यांना हे सुद्धा समजले पाहिजे की त्यांनी वाईट प्रकारे वागल्यास हे प्रेम संपुष्टात येईल. मुले फक्त प्रेमाला प्रतिसाद देतात. त्यांना पैसा किंवा दुसरे काही समजत नाही. तुमच्या मुलांमध्ये तुम्ही प्रस्थापित केलेले प्रेम ही फार मौल्यवान गोष्ट होते. सहजयोग हा ईश्वरी प्रेमाच्या पायावर उभारला आहे आणि लोक प्रेमळ असतील तरच तो कार्यान्वित होईल. जर त्यांनी त्यांची स्वतःची मुले किंवा कुटुंबे यांवर प्रेम न करता पैसा, सत्ता, त्यांचे नाव यांवर प्रेम केले तर ते त्यांच्या समजातील फक्त फार मोठा भाग हरवून बसणार आहेत.

राजा म्हणून श्रीकृष्णांना लोकांना धर्माप्रमाणे ठेवायचे होते. त्यांना पंचमहाभूतांची गरज होती. म्हणून त्यांनी त्यांना पाच स्त्रियांशी विवाही केला. पण त्याच्या अवताराचे सार आहेत की ते योगेश्वर होते. त्यांच्या योगामध्ये पूर्णपणे अलिप्त पण वस्तुस्थितीसाठी त्यांना पाच पत्नी होत्या आणि शिवाय सोळा हजार स्त्रीया सुद्धा होत्या ज्या त्यांच्या पत्नी बनल्या, त्या दुसरे काही नसून त्यांच्या सोळा हजार शक्तीच होत्या. विशुद्धी चक्राच्या सोळा पाकळ्या गुणिले विराटाच्या १००० पाकळ्या मिळून १६,००० शक्ती होतात. या सोळा हजार शक्त्यांनी स्त्रीया म्हणून अवतार घेतला आणि भयंकर राजाने त्यांना पळविले. श्रीकृष्णांनी राजाचा पराभव केला, त्या स्त्रियांना सोडविले आणि लग्न करून त्यांना संरक्षण दिले.

जेव्हा आपल्याला विशुद्धीच्या बाधा असतात त्यावेळी आपल्या दोन्ही बाजूंना कोणत्या शक्ती आहेत आणि कोणत्या गुणांचा आपल्यामध्ये अभाव आहे ज्यांमुळे आपल्याला त्रास होत आहे हे आपल्याला समजले पाहिजे. आपण पाहू या, उजव्या बाजूची विशुद्धी आपल्याला लागते ते काय-

श्रीकृष्णांचे मूळ तत्त्व गोडवा. त्यांची शक्ती राधा रा उर्जा धा - जी उर्जा धारण करते ती. आणि त्यांची शक्ती म्हणजे आल्हाद आनंद देणारा गुण. श्रीकृष्णाचे गुण म्हणजे ते योगेश्वर होते, अक्षय, साक्षी आता ओलांडणारी, किंचाळणारी व्यक्ती, जोराने बोलणारी, स्वतःचे भान सोडून वागणारी व्यक्तीला उजव्या विशुद्धीचा त्रास होतो. हे समजून घेतले पाहिजे की आपल्याया कोणाला रागवायचे असेल तर "तू" हे काय करतो आहेस' हे गोडव्याने म्हटले पाहीजे. सर्वात उत्तम म्हणजे शांतता राखून मौनाने - उजव्या विशुद्धीला आराम देणे.

उजव्या बाजूला (लिव्हर) यकृतापासून उष्णता यायला सुरूवात होते. ती वर येते, प्रथम ती उजव्या ह्रदयाकडे जाते. त्यामुळे तुम्ही खूप रागीट पती किंवा पिता बनता. नंतर ती उजव्या विशुद्धीकडे जाते. तुम्ही खूप चिडचिडणारे रागीट व्यक्ती बनता. कधी कधी लोकांवर ओरडणारे तुम्ही तुमचा राग त्या तऱ्हेने काढला तर ती व्यक्ती तुम्हाला घाबरू लागेल. त्याला न्यूनगंड होईल. कदाचित ती डावीकडे जाईल. एखाद्यावर कोणीतरी पूर्ण वेळ ओरडत असेल तर त्याचे काय होईल ते देवच जाणे.

श्री कृष्णांच्या जीवनावरून आपल्याला हे कळते की ते कसे बासरी वाजवत व पूर्ण आसमंतात काही खळबळ न उठता पूर्ण शांतता नांदे. पण हल्लीच्या काळात ते उलट झाले आहे. जिथे उजवी विशुद्धी तुटण्याच्या किंवा फुटण्याच्या बेतात आहे. जिथे संगीत तुम्हाला आनंद देत नाही. पण जास्त आणि जास्तच चेतावते. अशा संगीतामुळे श्रीकृष्णाच्या विराटाच्या अंगाची मेंदूमधील स्थान बधीर होऊन जाते. उजव्या विशुद्धीकडून ते सहस्त्राराकडे जाते. मग तुम्ही अंमली पदार्थ घेता कारण तुमचा मेंदू बधीर झाला असतो. मग तुम्हाला वाटते हे पुरेसे नाही म्हणून तुम्ही जास्त तीव्र अंमली पदार्थ घेता अशाप्रकारे तुमचे चालू रहाते. शेवटी तुम्ही अशा स्थितीला येता की तुम्ही कुठेच नसता. जिथे हे सर्व स्वतःचा नाश करते.

श्रीकृष्ण ते ईश्वरी मुत्सद्दी होते. ईश्वरी मुत्सद्दीपणा काय आहे? तुम्हाला ओरडायला नको. तुम्हाला कोणाला निर्णयाप्रत आणावयाचे असेल तर उत्तम गोष्ट म्हणजे विषय बदलणे. ती फार कौशल्याची गोष्ट आहे. त्या व्यक्तिबरोबर एकतानता साधणे म्हणजे त्या व्यक्तीला क्रीडेमध्ये गुंतविणे. हे समजले पाहीजे की या सर्व मुत्सद्दीपणाचा मूलतत्व म्हणजे ''हित'' हाच आहे. तुम्हाला सर्व मानवजातीचे हित साधायचे आहे. जर ते तुम्ही साधत असाल तुमच्या स्वतःच्या फायद्यासाठी किंवा एका विवक्षित व्यक्तीसाठी तुम्ही ते करीत नाही. त्यामुळे ओरडण्याची गरज नाही. त्याच्याशी खेळ करत जे हित आहे त्या बिंदूपर्यंत या. श्रीकृष्णांनी सांगितले तुम्हाला सत्य सांगितले पाहिजे. पण ते आवडणारे पण पाहीजे आणि हितकारकही हवे. समजा तुम्ही कोणाला सत्य सांगितले त्या क्षणाला त्याला कदाचित ते आवडणार नाही. पण ते त्याच्या हितासाठी असेल तर कालांतराने तुम्ही त्याला मदत केली म्हणून तो तुमचे अनेक उपकार आहे असे मानत राहील. हितासाठी थोडे खोटे तरी हरकत नाही कारण श्रीकृष्ण ही त्याची देवता त्याला माहीत आहे.

लोकांचे काय चुकते ते सांगण्यापासून तुम्ही दूर राहू शकत नाही. मुख्यत्वे ते लोक जे तुमच्या ताब्यात आहेत जसे तुमचे कुटुंब, नातेवाईक वगैरे. जे योग्य आहे ते सरळ सांगणे योग्य. ते तुमचे कर्तव्य आहे. लोक ते सुद्धा चुकवितात. ज्या लोकांना आपल्या मुलांना तोंड द्यावयाचे नसेल ते त्यांना एकामागून एक खेळणी देत राहतात. शिस्त म्हणजे दबाव नव्हे. पण त्याचा अर्थ आपण जे करतो ते तुमच्या आत्म्याच्या हितासाठी तसेच इतरांच्या आत्म्याच्या हीतासाठी असते. ती सहज शिस्त आहे.

डावी विशुद्धी ही वीजेसारखी असते. ओरडणाऱ्या, किंचाळणाऱ्या व्यक्तीप्रमाणे, विष्णुमायेप्रमाणे जे दुसऱ्यांना उघडकीला आणतात. बहुतांशी ज्या लोकांना दोषी वाटते त्यांचा आत्मविश्वास संपुष्टात आला असतो आणि त्यांच्या अहंकाराने डाव्या बाजूला प्रवेश केला असतो. ती फार गुंतागुंतीची स्थिती आहे. आपल्याला दोषी वाटत नाही. यावर आपण लक्ष ठेवले पाहीजे. दोषी ही फक्त दंतकथा आहे. आपल्याला वास्तवतेतून सुटून जायचे असते म्हणून आपण म्हणतो. आपण दोषी आहोत. वास्तवतेला आपण तोंड दिले पाहीजे. स्वतः आणि दुसरे यांच्यात काय चुकले आहे ते शोधण्याचा प्रयत्न करा. कारण विष्णुमाया दुसरे काही नाही. पण वीजेसारखी आहे. वीज लोकांना उघडकीला आणते. ती लोकांवर ओरडते, किंचाळते, गर्जना करते. तुम्हाला डावी विशुद्धी लागत असेल तर तुम्हाला या गोष्टी उपयोगात आणल्या पाहीजेत. ज्या व्यक्तीला डावी विशुद्धी असेल त्याने समुद्रावर जावे आणि समुद्राला म्हणावे, ''मी सागराचा स्वामी आहे, मी हे आहे, मी ते आहे,'' मोठ्याने म्हणावे.

घशामध्ये उजव्या बाजूला श्री कृष्णांची शक्ती व्होकल कॉर्डसवर असते. गोडव्याची शक्ती तीच गोष्ट विष्णुमायेची सुद्धा आहे. विष्णुमाया ही अव्यक्त शक्ती आहे. पण ती शक्ती ओरडायला किंचाळायला, ती तिथे आहे हे तिचे अस्तित्व दाखवायला वापरते. आता ही जी चमत्कारांची छायाचित्रे तुम्हाला दिसतात ते विष्णुमायेमुळे. ती वीजेप्रमाणे कार्य करते व हे सर्व संभाळते. जरी श्री कृष्णांची बहीण असली तरी ती खूप सूक्ष्मांत आहे. आणि सूक्ष्मतेमध्ये ती तुम्हाला मदत करते. आता या मायक्रोफोनमध्ये वीज आहे आणि तुम्हाला आश्चर्य वाटेल त्यामधून व्हायब्रेशन्स जात आहेत. इथून ते तुम्हाला हवे तिथे जाऊ शकतात. दुसऱ्या बाजुला तुम्ही कॉम्प्यूटर ठेवून त्यांना कॉम्प्यूटरमध्ये घालू शकता. ही किती लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे की जी ओरडणारी, किंचाळणारी, गर्जना करणारी आहे ती डाव्या बाजूला आहे. ज्यामुळे ती अव्यक्त स्वरूपात जे लोक स्वतःला दोषी मानतात, न्यूनगंडाने पछाडलेले असतात, जे लबाड आहेत ते कुचकामी आहेत असे त्यांना वाटते, त्यांच्यामध्ये अस्तित्वात असते. विरोधाभास पहा. ज्या माणसाला आत्मविश्वास नाही त्यामध्ये तिची शक्ती प्रकटते. आणि तिची शक्ती निश्चयपूर्वक सिद्ध करते त्यामुळे लोकांना आत्मविश्वास मिळतो.

आपली विशुद्धी स्वच्छ ठेवली पाहीजे हे आपल्याला समजणे महत्त्वाचे आहे. सर्वप्रथम आपल्याकडे सुरेख व स्वच्छ हृदय पाहीजे ज्यांत श्रीकृष्णाच्या मधूर संगीताचा सुगंध आहे. तुमची विशुद्धी वाढवा. ठीक करा. विराटाकडे पहा, तुमचे काय चुकते आहे ते शोधा आणि ती ठीक करा. कारण दुसरे कोणी ते करू शकणार नाही. तुम्हाला स्वतःबद्दल पूर्ण कल्पना आहे हे पहा. तुमची विशुद्धी चांगली असेल तरच ते होऊ शकेल. नाहीतर तुम्ही स्वतःला पाहू शकणार नाही कारण फक्त विशुद्धीच्या बिंदूवरच तुम्ही साक्षी होऊ शकता. जर तुम्हाला साक्षीस्वरूपाची स्थिती लाभली असेल तर तुमचे काय चुकते हे तुमच्या विशुद्धीत तुम्ही पाहू शकाल. तुमच्या अडचणीत काय चूक आहे. तुमच्या परिसरात काय चूक आहे आणि सगळे काही तेव्हा आज जेव्हा आपण श्रीकृष्णाची पूजा करीत आहोत त्यावेळी आपल्याला हे कळले पाहीजे की शेवटी तेच मेंदू बनतात. पोटातील चरबी मेंदूमध्ये जाते. त्यामुळे श्री नारायण मेंदूमध्ये शिरतात आणि विराट बनतात - अकबर, जेव्हा ते अकबर बनतात तेव्हा ते जड सृष्टीतील मेंदू बनतात. त्यामुळे लोक जेव्हा श्रीकृष्णाची पूजा करतात तेव्हा ते अहंकारविरहित बुद्धीमान लोक बनतात. त्यांचा मेंदू प्रगत होत जातो आणि त्याबद्दल त्यांना अहंकार नसतो. अहंकारविरहित बुद्धीमत्ता, ज्याला मी शुद्ध बुद्धिमत्ता म्हणते ती प्रकट होऊ शकते.

ईश्वराचे तुम्हाला आशिर्वाद देवो.

# मॉस्को विद्यापीठामधील श्री माताजींच्या भाषणाचा सारांश

आमची योग पद्धती व त्यांची उत्तुंगता याबद्दल सांगण्यासाठी मी आज इथे आले आहे. आमच्याकडे तीन प्रकारच्या चळवळी चालू होत्या. पहिली म्हणजे विश्वाला ताब्यात ठेवणाऱ्या नियमांचे संशोधन करणे. फार पूर्वीपासून वेदांतही ते आहेत. वेद म्हणजे जाणणे. पण सत्य जर माहीत नसेल तर सर्व अभ्यास निरूपयोगी आहेत.

दुसरी पद्धती म्हणजे भक्ति नावाचे सत्य शोधण्याचा ध्यास. आणखी एक महत्वाची पण गुप्त अशी व्यक्तिचा आत्मसाक्षात्कार मिळावा यासाठी चालणारी पद्धती पातंजली. ज्याने आठ भागात सुत्रे लिहीली आहेत त्यानेसुद्धा सुरवातीला त्यातील यम - नियम यासारख्या शारिरीक अंगाबद्दल भाष्य केले आहे. पण तो तिथे थांबला नाही. शेवटी ज्याला मी ऋतंभर प्रज्ञा म्हणते त्या सूक्ष्म प्रेमशक्तिकडे तुम्हाला पोचावे लागते. गोरखनाथ, आदिनाथ, मच्छिंद्रनाथसारखे मानवाचे मध्यमार्गात उत्थान होण्यासाठी काम करणारे अनेक योगी होऊन गेले. त्यांनी मानवाच्या प्रश्नांवर काम केले. उत्थान कसे साधता येईल त्यावर काम केले. माणसामधील सुप्त शक्ति तसेच त्रिकोणाकृतिक अस्थिचे त्यांनी संशोधन केले. एक हजार वर्षापूर्वी मार्कंडेय या बाबतीत बोलले होते. त्या आणि नवव्या शतकात वसू गुप्ताने त्याबाबत लिहीले होते. तर त्याचा उच्चांक किंवा परिणिती आत्याने नव्या जाणिवेत पोहचण्यात आहे.

तुम्हाला शाश्वत (अक्षय) शोधले पाहीजे असे सर्व धर्मात म्हटले आहे. क्षणभंगूर गोष्टी त्यांच्या एक मर्यादेतच वापरल्या पाहीजेत पण सर्व धर्म पूर्णपणे रसातळाला गेले आहेत. त्यांनी भयंकर बंधने, अटीतटी चालून दिल्या आहेत. धर्माच्या नावाखाली लोकांनी लढायला सुरवात केली.

तर ही शक्ति प्रत्येक मानवाच्या त्रिकोणाकार अस्थिमध्ये राहाते. उत्क्रांतीच्या क्रियेमध्ये अमीबाच्या स्थितीमधून आपण जेव्हा मानवाच्या अवस्थेप्रत येतो त्यावेळी मध्य मज्जासंस्थेवर सूक्ष्म चक्रांची निर्मिती होते. ती पॅरासिम्पथॅटिक नर्व्हस सिस्टीमवर असतात.

आपण जर सत्य शोधत असलो तर आपल्याला कळले पाहीजे की सत्य म्हणजे जे आहे ते जे तुम्ही पाहू शकत नाही. तुम्ही प्रकाश असाल तर तुम्हाला प्रकाश दिसत नाही. आपल्या मध्य मज्जासंस्थेवर ब्रम्हचैतन्य समजले पाहीजे, ते कसे काम करते आणि आपण त्याला कसे कार्यान्वित करायचे ते समजले पाहिजे. मानवी जाणीवेच्या स्तरावर आपल्याला सत्य समजू शकत नाही. आपल्याला आत्मा व्हावे लागते. डोक्यामध्ये (फॉन्टनेल बोन) टाळूच्या जागी आत्म्याचे स्थान आहे. प्रश्न आहे तो कुंडलिनी वर चढविणे आणि टाळूच्या जागेवरून बाहेर पडून तिचे ब्रम्हचैतन्यशी संधान साधण्याचा कुंडलिनी वर चढते तेव्हा सहा चक्रांतून जाते आणि टाळूच्या ठिकाणी छेदन करते आणि आपल्या शारिरीक, मानसिक भावनिक आणि अध्यात्मिक व्यक्तिमत्वाचे पोषण करते. हे सहज होते. ही जिवंत क्रिया आहे. आपल्या उत्क्रांतीमधला हा शेवटचा टप्पा आहे. तुमच्या बोटांच्या टोकांवर थंड वाऱ्याच्या स्वरूपात तुम्ही त्याला जाणू शकता.

अद्ययावत युगामध्ये आपल्याला कशासाठीसुद्धा वेळ नसतो म्हणून अद्यावत सहजयोग अशा तऱ्हेने प्रगत झाला आहे की प्रथम तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळतो. मग तुम्ही स्वतःच तुम्हाला जो काही थोडा प्रकाश मिळतो त्यांत स्वतःमध्ये काय दोष आहेत ते पहावेत. ज्ञानाला अंत नाही. तुम्ही जेव्हा या खोलीत येता तुम्हाला दिवा लावायचा असतो आणि प्रकाशाची पूर्ण व्यवस्था जणू चमकते. विजेचा उगम आणि इतिहास शोधण्यापेक्षा बटण दाबून दिवा लावणे बरे,

- सहजयोग याप्रमाणे कार्य करतो.

★

# श्रीगणेश पूजा

## १० ऑगस्ट स्वित्झर्लंड श्री माताजींचे भाषण सारांश

प्रत्येक पुजेआधी आपण श्री गणेशांचे स्तवन करीत असतो. आणि आपल्याला श्री गणेशाबद्दल अतोनात आदर आहे कारण ते अबोधितेचे प्रतीक आहेत. आपल्यामध्ये त्यांची जागृती झाली नाही तर आपण ईश्वरी साम्राज्यात प्रवेश करू शकत नाही आणि श्री गणेशांचे आशिर्वाद आपण उपभोगिले पाहीजेत. आपली अबोधिता पुर्णपणे उमलली पाहीजे. म्हणून आपण त्यांचे स्तवन करतो आणि ते सहजगत्या संतोष पावतात. सहजयोगमध्ये येण्याआधी ज्या काही चुका आपण केल्या असतील त्या सर्वांना ते क्षमा करतात कारण ते अक्षय बालक आहेत. तुम्ही मुलांना पाहीले आहे. तुम्ही त्यांना चापट मारा, कधीतरी रागवा, ती सर्व विसरून जातात. अगदी आधीपासून आईला मूल जन्माला येते, तेव्हापासून त्याला कशाकशातून जावे लागले हे त्याला माहीत नसते. नंतर हळूहळू स्मृति कार्यान्वित होते आणि स्वतःमध्ये गोष्टी साठवून ठेवणे चालू होते. बालवयामध्ये मुलांना फक्त त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या व्यक्ति आठवतात. पण जेव्हा ते मोठे होतात, त्यावेळी त्यांना ज्यांनी त्रास दिला आहे, फक्त तेवढयाच व्यक्ति आठवतात आणि तशाप्रकारे ते स्वतःला दुःखी बनवितात.

पण गणेशतत्व खूप सूक्ष्म आहे. सर्व गोष्टीत त्याचे अस्तित्व असते. जड वस्तूंमध्ये ते व्हायब्रेशन्सच्या रूपात असते. व्हायब्रेशन्स नाहीत अशी कोणतीच वस्तू नाही. अस्तित्वात असलेल्या सर्व जड वस्तुंना असलेली व्हायब्रेशन्स त्यांच्या ॲटम आणि मॉलिक्यूलमध्येसुद्धा दिसतात. म्हणजे श्री गणेश हे पहिले होते ज्यांना जड वस्तूंमध्ये प्रस्थापित केले. आणि त्याच परिणाम म्हणून आपल्याला सूर्य, चंद्र या निर्मितीमधील पूर्ण विश्वांत, त्यांचे अस्तित्व दिसते. मानव प्राण्यामध्येसुद्धा त्यांचे अस्तित्व चालू राहतेच. स्वतःच्या अबोधितेला झाकून आणि श्री गणेशांचा सूज्ञपणा बंद ठेवून त्यांचे अस्तितव नाकारण्याचे स्वातंत्र्य मानवाला आहे. त्यामुळेच मनुष्य कितीतरी भयानक गोष्टी करताना आपल्याला सापडतो. पण ते कार्य करीत असतात. अशाप्रकारे की आपल्या चुकीच्या कर्मांचा नैसर्गिक परिणाम झालेला आपल्याला दिसतो. श्री गणेशांना न आवडणाऱ्या गोष्टी जेव्हा तुम्ही करता त्यावेळी एका टोकापर्यंत ते तुम्हाला क्षमा करतात. आणि त्यानंतर शारिरीक रोगांच्या स्वरूपात आणि स्त्रीयांमध्ये मानसिक रोगांच्या स्वरूपात ते प्रकट होऊ शकतात. निसर्गातहीप्रश्न उद्‌भवू शकतात. नैसर्गिक महासंकटेसुद्धा फक्त श्री गणेशांचेच शाप आहेत. जेव्हा लोक चुकीच्या गोष्टी करतात, सामुहिकतेमध्ये चुकीच्या तऱ्हेने वागतात, तेव्हा त्यांना शिकवण देण्यासाठी नैसर्गिक महासंकटे येतात. त्यामुळे त्यांचे सार, ते सर्वत्र अस्तित्वात असले तरी, त्यांची इच्छा बजावण्याची सुद्धा सर्व विश्वाचा विनाश करण्याची त्यांची क्षमता आहे.

आपली श्री गणेशांबद्दलची कल्पान छोटेखानी असल्याची आहे. आपल्याला वाटते, छोट्याशा उंदिरावरून जाऊ शकतात तेव्हा ते खूप छोटे असले पाहिजेत. ते जेवढे महान आहेत तितकेच लहान आहेत. सूज्ञपणामुळे सर्व देवतांहून वरचढ आहेत. ते सूज्ञता देतात. आपल्याला शिकायला लावतात ते आपले गुरू आहेत. त्या संदर्भात महागुरु कारण आपण कसे वागावे ते आपल्याला शिशकवतात. तुम्ही जर त्यांच्याहून वरचढ होण्याचा प्रयत्न केला, चुकीचे वर्तने केले, तर आईसुद्धा आधार देणार नाही. जे लोक श्री गणेशांहून

वरचढ होतात ते आईचा कधीही आदर न करणारे लोक असतात. त्यांना दुसरे कोणीही देव माहीत नाहीत. त्यामुळे आईला पूर्णपणे शरण जाण्याची शक्ति ते आहेत त्यामुळे सर्व देवतांमध्ये सर्वांत शक्तिमान देव ते आहेत आणि त्यांच्या शक्तिमध्ये कोणीही त्यांना मागे टाकू शकत नाही.

आपल्याला समजले पाहीजे की जशी मुले वाढतात त्याप्रमाणे श्री गणेश त्यांच्याबरोबर वाढू लागतात, पण ती मानवच असल्यामुळे ती श्रीगणेशांना काबूत ठेवण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे पालकांचे हे कर्तव्य आहे की त्यांनी अलिप्त राहून मुलांची काळजी घ्यावी, म्हणजे त्यांच्यामध्ये श्रीगणेश स्थिती श्रीगणेश स्तित होतील. मुलांमधील श्रीगणेशांचे पहिले लक्षण म्हणजे सूज्ञपणा. जर मूल सूज्ञ नसेल, त्रासदायक असेल, कसे वागावे हे त्याला कळत नसेल तर श्रीगणेशांवर ते हल्ला करते आहे हे दिसते. आणि हल्लीच्या दिवसात या आधुनिक युगांत मुलांवर अनेक हल्ले होत असतात. अबोधितेवर हल्ला चालू असतो आणि मुलांबरोबर कसे वागायचे आणि कसे वागायचे नाही यामधील नाजुक रेघ कशी आखावी हे लोकांना कळत नाही.

ते सूज्ञता देतात. तेव्हा पालकांना कळले पाहीजे, "जर ते सूज्ञता देतात तर माझ्यामध्ये सूज्ञता असली पाहीजे आणि जर माझ्यामध्ये सूज्ञता असली तर माझ्यामध्ये संतुलनही आहे. मुलांबरोबर वागताना मी भान सोडणार नाही. पण त्यांना अशा तऱ्हेने सुधारेन की ते ठिक होतील" याउलट तुम्ही जर मुलांबरोबर खूप कठोर वागण्याचे ठरवले तर ती प्रतिक्रिया म्हणून चुकीच्या मार्गाने जातील किंवा तुम्ही फार जास्त त्यांना मर्यादित ठरवले तरीसुद्धा ती त्याच पद्धतीने वागतील. म्हणून एक गोष्ट तुमच्या मुलांना शिकविली पाहीजे ती म्हणजे तुमच्या आईचा आदर करणे, तुमची आई, जी पवित्र माता आहे आणि तुमची स्वतःची आई आहे. वडिलांनी जर मुलांना आईला सन्मान द्यायला शिकविले नाही तर मूल कधीच नीट होणार नाही. कारण निःशंकतः अधिकार हे वडिलांकडे असतात पण आईला सन्मान दिला पाहिजे आणि त्यासाठी आईने वडिलांचा सन्मान राखला पाहिजे हे महत्वाचे आहे. तेव्हा मुलांच्या सान्निध्यात तुम्ही एकामेकांशी भांडणे, अयोग्य प्रकारे वागणे याचा मुलाच्या गणेशतत्वावर खूप वाईट परिणाम होतो. अशा प्रकारचे संगोपन सहजयोगामध्ये फार महत्वाचे आहे कारण ईश्वराच्या कृपेने तुम्हाला आत्मसाक्षात्कारी मुले झाली आहेत. त्यामुळे मुलांना सूज्ञ, नितीमान, सदाचरणी बनविण्यासाठी कोठपर्यंत जावे हे तुम्हाला कळले पाहीजे. प्रथम त्यांचा सूज्ञपणा जतन करा. त्यांनी काही सुरेख म्हटले तर कौतुक करा पण त्यांनी ते अयोग्य ठिकाणी, आकर्षक वाटणार नाही असे म्हणता नये. अयोग्य वागणे सहन होणार नाही या संदर्भात की जे काही चातुर्य अंतर्यामी असेल ते बाहेर प्रकाशाच्या स्वरूपात प्रकट केले गेले पाहीजे.

आता आपण श्री गणेश कुठेपर्यंत कार्य करतात ते पाहायला आणखी खोल जाऊ या. उदाहरणार्थ व्हायब्रेट केलेले पाणी म्हणजे त्या पाण्यात गणेश तत्व जागृत केले आहे. हे पाणी तुमच्या पोटात, तुमच्या डोळयात जिथे जिथे जाते तिथे ते अशा प्रकारे काम करते की त्यामधील गणेश तत्व ते जागृत करते. शेतीच्या बाबतीतले चमत्कार तुम्ही पाहीले आहेत. तीमधले गणेशतत्व तुम्ही जागृत केले की ते दहा किंवा शंभर होते. पृथ्वीमाता सुद्धा आपल्याला वाटते निर्जीव आहे ती व्हायब्रेट करू शकते. समजा सहजयोगी जमीनीवर अनवाणी चालत गेले तर पृथ्वी माता व्हायब्रेट होते आणि ते झाडे, गवत, फुले सर्वांवर कार्य करते.

जागृत केल्यावर गणेशतत्वाला गोष्टी समजतात. ते संघटीत करते व कार्य करते. जेव्हा एखाद्या बीच्या टोकाला दुसरी बी उगवते तेव्हा तिथे एक छोटी पेशी असते ज्यांत गणेशतत्व असते ते जागृत होते, कसे खाली जायचे, कसे दगडाभोवती वळायचे, कसे पाण्याकडे जायचे हे त्याला माहीत असते. पण अस्तित्व टिकवण्यासाठी किती लांब जायचे, भौतिकतेच्या स्तरावर स्वतःचे कसे पोषण करायचे, झाडाला कसे वाढू द्यायचे इतकेच त्याला ठाऊक असते. पण आज्ञा चक्राच्या बिंदूवर हे गणेशतत्व खूप खूप सूक्ष्मांत जाते, आज्ञाचक्रावर त्याला समजते की आता त्याला अध्यात्मिक पातळी आली आहे. जे गणेशतत्व मुळाच्या टोकाशी काम करीत होते तेच आता अध्यात्मिक गोष्टीसाठी काम करू लागते. त्यामुळे लोक ध्यान करतेवेळी डोळे बंद करून घेतात . त्यांना दूसरे काही बघायचे नसते, त्यांच्या कुंडलिनीच्या ध्यनासाठी श्री

गणेशांनी कार्यान्वित व्हावे एवढेच त्यांना हवे असते. जेव्हा आपण डोळे बंद करतो तेव्हा हे ध्यान कार्यान्वित होते. झोपण्याच्या वेळी डोळे फिरत असतात.

हे गणेशतत्व आता तुमच्या चित्ताने कार्यान्वित होत आहे. जर तुमचे चित्त भरकटणारे असेल तर त्यावर परिणाम होईल. जेव्हा आपण स्त्रीयांकडे किंवा पुरूषांकडे पूर्ण वेळ बघत राहातो त्यावेळी हे गणेशतत्व नाश होते. अशा लोकांची प्रगति जास्त अवघड असते कारण आज्ञाचक्रच बाधित झाले असते. तुम्ही जेव्हा फारच भौतिकवादी असता, नेहमी तुमच्या गोष्टींबद्दल काळजी करत किंवा तुमच्या भौतिक वस्तूंच्याबद्दल काळजी करता त्यवेळी सुद्धा गणेशतत्व गमावता. जसे आपण दुकानात जातो आणि प्रत्येक गोष्ट बघत राहातो काय विकत घ्यायचे म्हणून, पण सौंदर्यासाठी तुम्ही काही विकत घेत असला, दुसऱ्यांना खूष करण्यासाठी घेत असाल तर ते उलट दिशेने कार्यान्वित होते. तुमची प्रगती वेगाने होते. पण दुसऱ्या लोकांना मत्सर वाटण्यासाठी तुम्ही काही विकत घेत असाल तर गणेशतत्व नाश पावते.

ही खूप मातृत्वासारखी गोष्ट आहे. जसे आईला मुलांना खूष ठेवायचे असते. त्यांना जेवण द्यायचे असते. तशाप्रकारचे वात्सल्य असते. एखाद्या कलाकाराची तुम्ही नोंद घेता तेव्हा तुम्ही महान गणेशतत्वाचे समाधान करता कारण कलाकार स्वाधिष्ठानामधून जड वस्तूंतून सर्व सुरेख गोष्टी तयार करीत असतात. श्री गणेशांनी स्वाधिष्ठान नियंत्रित केल्याशिवाय ते सुरेख होत नाही. हल्ली कलाकारांचा ओढा विचित्र आणि अनैतिक गोष्टींकडे आहे आणि या गोष्टना चिरंतन मुल्ये नाहीत. आज लोक त्या विकत घेतील आणि उद्या टाकून देतील. फक्त ज्या गोष्टींमध्ये गणेशतत्व सूक्ष्मांतून कार्यान्वित होत आहे, जे तुम्हाला शांती देते, जे तुम्हाला आनंद देते ते फक्त कौतुक होते.

म्हणजे गणेश तुमच्यामध्ये उच्चतर "स्व" ची प्रस्थापना करतात. मूलभूत "स्व" जो आयुष्यातल्या सर्व मुलभूत गोष्टी उपभागतो तो पूर्णपणे छाटला जातो किंवा त्याचा नाश होतो. तुम्ही मोनालिसाला पाहीलेत तर ती कोणी नवी नाही किंवा एखादी सौंदर्यस्पर्धा जिंकणारी नाही. पण तिचा चेहर प्रसन्न, मातृत्वाचा निर्देशक आणि पवित्र आहे. तिचे इतके कौतुक अक्षय का होते? कारण म्हणजे गणेशतत्व तिच्यामध्ये आहे. ती आई आहे. अशी गोष्ट सांगितली जाते की या बाईचे मूल हरविले होते. ती कधीच हसत नव्हती किंवा रडत नव्हती. मग एक छोटे मूल तिच्याकडे आणले गेले तिने ते मूल पाहीले आणि मूलाविषयीच्या तिच्या प्रेमामुळे जे स्मितहास्य तिच्या चेहऱ्यावर उमटले ते या महान कलाकाराने चित्रांकित केले आहे. अंडी फोडून मुले बाहेर काढत असताना मगरीचेसुद्धा डोळे इतके मृदु आणि प्रेमळ बनतात पण जेव्हा तुम्ही आधुनिक बनता त्यावेळी तुमच्या क्रिया फार विचित्र होतात. म्हणून मुलांविषयीचे तुमचे प्रेम खूप जास्त महत्वाचे आहे. पण सहजयोगी म्हणून फक्त तुमच्या मुलांविषयी तुमचा जिव्हाळा असता नये.

तुमच्या प्रेमामध्ये पूर्ण अंतर कसे ठेवायचे हे तुम्हाला समजले पाहीजे. अंतर म्हणजे हित. "हे माझ्या मुलाच्या हिताचे आहे का? मी त्याला खराब करतो आहे? मी माझ्या मुलाला फाजील प्रात्साहन देत आहे का? मी माझ्या मुलाच्या हातात खेळतो आहे का? का मी मुलाला व्यवस्थितपणे संभाळतो आहे? कारण बाल्यात मुलांना आईवडिलांनी संभाळायचे असते. मुलांनी आज्ञाधारक असले पाहीजे कारण आईवडिलच एकमेकांशी आज्ञाधारक वागत नाहीत आणि तुम्हाला असे समाज आढळतात जिथे मुले आईवडिलांना त्रास देत राहातात. त्यामुळे ते सुद्धा तसेच होतात. पण हरकत नाही. तुम्ही सहजयोगी आहात तुमची मुले आज्ञाधारक, सुज्ञ समंजस होतील अशाप्रकारे तुम्ही वाढविली पाहीजेत. मगरीचे जसे तिच्या लहान बाळांवर प्रेम असते त्याचप्रकारे.

आपल्यामध्ये चांगले संबंध ठेवण्यासाठी या गोष्टी महत्वाच्या आहेत. आपल्याहून जे लहान आहे, विशेष चांगल्या परिस्थितीत नाहीत, जे इतके कुशल नाहीत, ज्यांना सहजयोगाचे इतके ज्ञान नाही. जे सहजयोगात जास्त सिनीअर नाहीत. त्यांच्याकडे तुम्ही वडिलांप्रमाणे लक्ष दिले पाहिजे. आपण म्हणू शकतो आईप्रमाणे आपल्याकडे गणेतत्व आहे. गणेशतत्वाला जागृत करा. उच्चतर स्थितीतले गहनांतले मिळवण्यसाठी त्यांना आपल्यावर अवलंबित असल्याचे समजले पाहीजे कारण गुरूतत्व पुर्णपणे गणेशतत्वाशी साधले गेले आहे. त्यामुळे ज्याला गणेशतत्व नाही तो भयंकर बनतो.

जीवन ही निरंतर (सारखी चालू असणारी) क्रिया आहे आणि पूर्ण वेळ पूर्णतत्वाशी जोडले असावे लागते. तुम्ही जोपर्यंत पुर्णपणे जोडले जात नाही तपर्यंत अबोधितेची सामूहिकता तुम्ही समजू शकत नाही. जसे मूल येत आणि दुसऱ्याच्या मांडीवर बसते. जसे कोण आई, कोण वडिल त्याला समजत नाही. आपण सगळे एकच साधन आहोत, यंत्र आहोत, माध्यम आहोत ज्यायोगे गणेशतत्वाचे आपण सगळीकडे प्रगटीकरण करतो. तर ही व्हायब्रेशन्स म्हणजे दुसरे काही नाही पण गणेशतत्व आहे. तो ओंकार आहे आणि जेव्हा तो असतो तेव्हा ते वात्सल्याचे संवेदन, आई आणि मूल यामधील प्रेमाचे संवेदन असते. हे संवेदन म्हणजेच व्हायब्रेशन. दोघांमधील अंतर म्हणजे व्हायब्रेशन आणि ते आपल्याला समजले पाहीजे. हे समजले पाहीजे की ती व्यक्ति अजून बालक आहे आणि आई बालकाला सर्व शक्ति देत आहे. त्याला वाढवित आहे. प्रेम देते आहे. मुलाच्या मर्यादा समजून घेत आहे. सर्व माधुरी, सर्व सूज्ञतेचे कौतुक करीत आहे ती व्हायब्रेशन्स आहेत.

आज आपण ऐकलेल्या ब्रम्हचैतन्याविषयी काहीतरी महत्वाचे मला सांगायचे आहे. ते दुसरे काही नसून फक्त व्हायब्रेशन्स आहेत. परमचैतन्य म्हणजे दुसरे काही नाही फकत व्हायब्रेशन्स जिथे सर्व एकत्व नाश पावते, जिथे आई नाश पावते, वडिल नाश पावतात. काही राहात नाही तिथे फक्त सूक्ष्म वात्सल्य असते तेवढेच आणि हीच एक गोष्ट आहे ज्यामधून सर्व काही येते आणि त्यामध्येच राहाते. उदा. सूर्याचे किरण बाहेर येतात क्लोरोफिल निर्माण करतात किंवा समुद्रातून ढग येतात आणि पृथ्वीमातेचे पोषण करतात. सर्व काही आत आहे. परमचैतन्याकडे सर्व काही त्याच्या आत आहे. आपण म्हणू शकतो सर्व काही दूसरे काही नाही पण ज्ञान आहे, काही नाही पण सत्य, काही नाही पण प्रकाश, पण जेव्हा याच्या लाटा बाहेर येतात तेव्हा या चैतन्याच्या लाटांच्यामध्ये आपण जातो आणि आपण दुर्लक्षी बनतो. दुर्लक्ष अस्तित्वात नसते. जसे अंधःकार आहे कारण तेथे प्रकाश नाही. प्रकाश आला की अंधःकार अस्तित्वात नसतो. असे होते कीलोक सागराच्या लाटांमध्ये जातात आणि हरवून बसतात. याप्रकारे आपण एक गोष्ट काळजीपूर्वक लक्षात घेतली पाहीजे की आपण परमचैतन्यात आहोत. परमचैतन्याने बनले आहोत. पूर्णवेळ त्याने वेढलेले असतो फक्त काही वेळा त्याच्या लाटांमध्ये हरवून बसतो आणि आपण का हरवतो? आपल्या स्वतःच्या अजाणतेमुळे.

आपण ब्रम्हचैतन्याचे सारसर्वस्व आहेत ही जाणीव येते. ही पूर्ण गोष्ट चिदविलास, दैवी चित्ताच्या लिलांचा उपभोग घेणे - या नावाने ओळखली जाते. आता तुम्ही म्हणाल, "असे कसे होइल?" उद्या आम्ही सूर्य बघतो, नंतर तळयामध्ये पाणी बघतो, सूर्यामुळे आम्हाला पाणी दिसते. मग समजा आम्हाला मृगजळ दिसले आणि हे पाणी असे समजून आम्ही या पाण्यामागे पळू लागलो तर, पण ही सर्व गोष्ट तर सूर्याची लिला आहे. याचप्रकारे परमचैतन्य काम करते आणि आपण परमचैतन्य आहोत या जाणीवेत आपण हरवून जातो. त्यामुळे लिला चालू होते.

तुम्ही जेव्हा बंधन देता त्यावेळी हे चैतन्य तुम्ही क्रियेत आणता. प्रत्येक क्रियेत, जे तुम्ही करता त्यात, परमचैतन्य काम करते हे तुम्ही जाणले पाहीजे. फक्त एक गोष्ट म्हणजे तुम्हाला तुमची स्वतःची जाणिव पाहीजे आणि ते कार्यान्वित होते. कितीतरी लोकांना ते मेंदूमध्ये समजते पण हृदयात समजत नाही. आणि कितीतरी लोकांना ज्यांना ते हृदयात समजते ते चित्तात कार्य करीत नाहीत. तेव्हा या तीन गोष्टी तुम्ही सुधारल्या पाहीजेत. एक म्हणजे तुमचे डोके, दुसरे म्हणजे तुमचे हृदय आणि तिसरे म्हणजे तुमचे लिव्हर (यकृत) या तीन अवयवांना जर तुम्ही सुधाराल तर परमचैतन्य कार्यान्वित होईल. पण हे सगळे पैशाकडे असलेले लक्ष-तिथे काही नाही. परमचैतन्य तुमच्यासाठी सगळे काही तयार करून शकते. ते पैसे निर्माण करू शकत नसेल कारण त्याला मन नाही. ते त्याच्या शक्यता निर्माण करू शकते आणि हे नीट लक्षात ठेवले पाहीजे आणि हे किती आनंदमय आहे की आता तुम्हाला परमचैतन्याची जाणीव झाली आहे आणि तुम्ही त्यात प्राविण्य मिळवू शकता, वर्चस्व नाही पण दासाप्रमाणे "हे कर आणि ते कर" असे आदराने. ते सर्व करेल. तुम्ही परमचैतन्यामध्ये आहात हे समजणे आणि त्यामुळेच तुम्ही खूप मधुर, प्रेमळ, मायाळू आणि सुज्ञ बनू शकता.

ईश्वर तुम्हाला आशिर्वाद देवो.

★

# दिवाळी पूजा

(श्री माताजींचे भाषण सारांश १९/१०/८९ मॉंटेकाटिनी)

दिवाळी पूजेचे कारण म्हणजे देवांचा आनंद जाणून घेणे. दिवाळी 1000 वर्षांपूर्वी जेव्हा श्री रामांचा राज्याभिषेक त्या दिवशी झाला तेव्हा साजरी केली गेली. म्हणजे मानवतेच्या हिताचे त्या दिवशी राज्यारोहण झाले. सॉक्रेटीसने वर्णन केल्याप्रमाणे तो हितकारी राजा होता. हितकारी राजाचे राज्यारोहण झाले ही आनंदाची गोष्ट होती. जेव्हा लोक प्रजेच्या हिताशिवाय दुसऱ्या कशाचाही त्याला विचार नाही असा राजा शोधून काढतात तेव्हाच फक्त ही गोष्ट शक्य होते. तेव्हा आपण या निर्णयाप्रत येतो की माणसाला सहजयोगी बनले पाहीजे.

आपल्याकडे दोन प्रकारचे सिद्धात आहेत. एक म्हणजे (कॅपिटॅलिझम) भांडवलशाही व कम्युनिझम साम्यवादी पहिली पैशावर आधारित व दुसरी आज्ञाधारकतेवर. जी सहज योगासाठी चांगली आहे. आज्ञाधारकपण इतका महान आहे की त्यांच्या हितासाठी त्यांना काही सांगा ते लगेच तसे करतात. ते इतके सूज्ञ आणि गहन झाले आहेत. उलट दुसरीकडे आपण व्यक्तिगत स्वातंत्र्यात हरवलो आहोत. भांडवलशाहीच्या देशात हित संपुष्टात आले आहे. जेव्हा तुम्हाला वेड्यासारखे धावत सुटायाचे स्वातंत्र्य असते, त्यावेळी तुम्ही स्वतःचा विनाश करून घेता. उदा. लोक कुठल्याही प्रकारच्या विचित्र फॅशनविषयी वेडे झाले आहेत. या कल्पना उद्योजकांपासून येतात. ज्यांना तुमचा पुरा फायदा घ्यायचा असतो. हित हे सर्वोच्च आहे. आपण खरोखर स्वतंत्र लोक असलो तर आपल्यासाठी जे हितदायी आहे ते आपण स्वीकारले पाहीजे.

दुसऱ्या दिवशी नरकासूर हा राक्षस देवाने मारला होता. आता दुष्ट लोक बक्षिसे घेत आहेत. हा विपर्यास कशासाठी? दुष्ट कृत्यात आनंद उपभोगणाऱ्या आपल्यामधील दुष्ट प्रवृत्तिचा नाश केला पाहीजे. आपल्याला आपले प्रश्न ओळखले पाहिजेत. जेव्हा तुम्ही स्वतः पाहात तेव्हा हृदय उघडे होते. तुमचे हृदय उघडल्याशिवाय तुम्ही स्वतःचा आनंद उपभोगू शकत नाही. तुम्ही तुमचे हृदय उघडा. सर्व बंधने अटी निघून जातील. प्रत्येक लहान गोष्टीमध्ये आनंदाचा तरंग आहे. तुमची जातपात, देश सर्व काही विसरा. तुम्ही जर सामूहिकतेमध्ये एकत्र होऊ शकला नाही तर तुमच्यामध्ये काहीतरी चुकते आहे.

या दिवशी लक्ष्मी देवतेची पुजा केली जाते. तिला गर्व नसतो ती इतरांवर दबाव घालत नाही. मानव प्राणी याउलट असतो. ज्यांच्याकडे पैसे असेल ते घोड्यांवरून जातात. ती पाण्यामधून बाहेर येते. कमळावर विश्रांती घेते आणि स्वतःचे वजन शोषून घेते. आपल्याला आपली स्थिती, पैसा, शिक्षण वगैरे सर्वांचे वजन शोधून घेतले पाहीजे. ह्या सर्व निरर्थक गोष्टी तुम्हाला जड व्यक्ति करून खाली ओढत असतात. ती संतुलनात उभी असते. तिच्या गुरूत्वाकर्षणाचा मध्ये इतक्या व्यवस्थित संतुलनात असतो. त्याप्रकारे तुम्हालाही संतुलनात राहीले पाहीजे. तुम्हाला पृथ्वी मातेवर उभारले पाहीजे म्हणजे लहानशी गोष्ट झाली तरी तुम्ही संतुलनामध्ये येऊ शकता.

तिच्या दोन हातात गुलाबी कमळे असतात. गुलाबी रंग तिच्या ऊब, आगत्य, प्रेमळपणाचा स्वभाव दाखविते. ऊब म्हणजे हॉस्पीटल नव्हे किंवा घाणेरडे घर नव्हे तर आगत्यपूर्वक, उबदार सोयीचे श्रीमंत माणसाकडे 10 कुत्रे बोहर असतात, आत कोणी येऊ शकत नाही. उंदीरसुद्धा, काहीही जास्त नको, दिमाख नको, चढाई नको पण इतरांना आनंद व सोय देईल असे एखाद्या गोष्टीचे कौतुक व्हावे आणि यजमानाने म्हणावे इतक्या थोडक्यात त्याने केले, ही अतिथीला आनंद द्यावा असे वाटणाऱ्या व्यक्तिची खूण आहे. हे किती महाग असे सांगणे म्हणजे चढून जाणे आहे.

तुम्ही सर्वांचा आनंद उपभोगीला पाहीजे नाही तर तुम्ही सहजयोगी नाही. कलावंतांना उत्तेजन दिले पाहीजे. कोणीतरी म्हणेल हा प्रामाणिकपणा नाही. कमळ चिखलाच्या तळयात उगवते, पण तुम्हाला चिखल दिसला नाही. पूर्ण तळे कमळ सुवास व सौंदर्याने भरते. तिथे प्रामाणिकपणा नसतो. सहजयोगी म्हणून तुमचे काम काय आहे हे प्रामाणिकपणे समजण्यात प्रामाणिकपणा आहे. तुमच्या प्रेमाने तुम्ही प्रत्येकाला उत्तेजन देत असता. तुमच्या प्रमाने प्रत्येकात विश्वास निर्माण करीत सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे स्वतःश प्रामाणिक रहा. प्रथम तुमच्या मनाने अजमाऊन घ्या. दुसऱ्याला लागले असे बोलणार असाल तर थांबणे बरे. दुसऱ्यांना खुष करणाऱ्या गोष्टी तुम्ही म्हणाल तर तुम्हाला खुष करणाऱ्या गोष्टी तुमच्याकडे येतात. काही लोक असे असतात जे कधीच हसत नाहीत. त्यांना गुदगुल्या करणे तुम्हाला माफ आहे. तुम्हाला मुलांसारखे बनले पाहीजे लक्ष्मीतत्वाचे एक तत्व आनंदी रहाणे हे आहे.

दुसऱ्या हाताने लक्ष्मी येते. पैसेवाल्या लोकांनी ज्यांना गरज आहे त्यांना पैसे द्यावे पण अशा तऱ्हेने की कोणाला कळू नये. गुपचुप, एका हाताला दुसऱ्या हाताने दिले आहे हे समजता नये. व्यक्तिची गरज काय आहे हे पाहायला पाहीजे. योग्य जागी आणि योग्य वेळी देण्याची गरज आहे. ते खळबळजनक नको. त्याने हृदय भरून आले पाहीजे. अध्यात्मिक वाढीसाठी तुम्ही जे द्याल ते उत्तम. उदा. मला फूलपुरे आहे कारण मी निग्रही आहे.

दुसऱ्या हाताने लक्ष्मी रक्षण करते. हा हात सर्व सहजयोग्यांना रक्षणकर्ता आहे. मी नेहमी सहजयोग्यांसाठी उभी राहीन कारण तिथे आत्मा हजर आहे. सर्व कलावंत, कला, काव्य, साहित्य, प्रामाणिक राजकारणी लोक, सरळमार्गी सरकारी नोकर आणि ज्यांना रक्षणाची जरूर आहे त्या सर्वांचे रक्षण करीन. पण जे खराब आहे त्याला आधार येता नये. दुसऱ्यांच्या चांगुलपणाचे रक्षण केले पाहीजे ते सहजयोगी नसले तरी हरकत नाही. त्यांच्या चांगल्या गुणांचे रक्षण केले पाहीजे. तुम्ही अक्षय, चिरंतन, जगाचे संरक्षक आहात. तुम्ही क्रूर होतात नये. जेव्हा सासू सूनेचे भांडण पहातो तेव्हा आपण म्हणतो किती भांडकुदळ आहे. तरी पण आपण तेच करतो. आपण तलवारी नाही, कमळे आहोत. कोणाला मारायचे असेल तर कमळ वापरा. कमळाने कसे मारायचे हे समजायला सहजयोगामध्ये खूप गहनतेत उतरले पाहीजे.

एकदा लक्ष्मीने तुम्हाला आश्रय दिला की तुम्ही महालक्ष्मीमध्ये वाढता. मग तुम्ही जगाच्या हिताचा विचार करता. त्यांना आत्मसाक्षात्कार कसा द्यायचा. तुमचा दृष्टिकोन बदलतो. आपण प्रश्न सोडविण्यासाठी इथे आहोत. जग हा आपला प्रश्न आहे. आपल्याला जबाबदाऱ्या घेतल्या पाहीजेत. तुम्ही आर्किटेक्ट असाल तर काहीतरी महान निर्माण करा. संगीततज्ञ असाल तर चांगले संगीत तयार करा. सरकारी नोकर असाल तर चांगले करा. मी तुम्हाला मदत करेन. प्रत्येकाचे व्यक्तिमत्व वाढते आहे. जर सुषुम्नेच्या मध्य मार्गावर रहाल तर कोणीही तुम्हाला हात लावू शकणार नाही. दुसऱ्यातल्या चुका तुम्हाला काढायच्या नाहीत. मग तुम्ही सहजयोगी नाही. लिडरनी सुद्धा ताबब्यात ठेवण्याचा प्रयत्न करू नये. सर्व ब्रम्हचैतन्य हे शांत तत्व आहे हे सर्व काही करते. तुम्हाला सर्व काही स्वीकारण्यासाठी, तसेच तुमच्या प्रगतीत कैलासाची उंची गाठण्यासाठी शांत राहीले पाहीजे. ईश्वर तुम्हाला आशिर्वाद देवो.

★